www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार

मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 188 वा सोमवार दि. 24 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

# किल्ले रायगडावरील वाघ्या कुत्र्याची समाधी हटवण्याची मागणी; कोणी आणि का केलेय ही मागणी?

किल्ले रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधी शेजारी असलेली वाघ्या कुत्र्याची समाधी काढून टाकावी अशी मागणी, माजी खासदार संभाजीराजे यांनी केली आहे. तसं पत्र त्यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलं आहे. समाधी हटवण्यासाठी त्यांनी सरकारला 31 मेपर्यंतची मुदत दिली आहे. वाघ्या कुत्रा नामक पात्राचा शिवकालीन इतिहासात कुठलाही उल्लेख किंवा संदर्भ सापडत नाही. त्यामुळे अशा प्रकारे कपोलकल्पित कुत्र्याचा पुतळा किंवा समाधी उभारणं, ही छत्रपती शिवाजी महाराजांशी घोर प्रतारणा असल्याचं संभाजीराजे यांनी म्हंटलंय. हिंदवी स्वराज्याची राजधानी दुर्गराज रायगड येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत कथित वाघ्या कुत्र्याची समाधी म्हणून एक संरचना काही दशकांपूर्वी उभारण्यात आलेली आहे. सदर वाघ्या कुत्रा नामक पात्राचा शिवकालीन इतिहासात कोणत्याही प्रकारचा उल्लेख अथवा संदर्भ मिळत नाही. भारतीय पुरातत्व विभागाने देखील सदर समाधी संरचना व वाघ्या कुत्र्याचे ऐतिहासिक महत्त्व यांबाबत त्यांच्याकडे कोणतीही ऐतिहासिक माहिती व पुरावे उपलब्ध नसल्याची स्पष्टोक्ती दिलेली आहे. समस्त भारतवासीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत एका कपोलकल्पित कुत्र्याची समाधी व पुतळा उभारणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव, श्रद्धेची कुचेष्टा व महान युगप्रवर्तक श्री छत्रपती शिवाजी महाराजांची घोर प्रतारणा आहे. कोणतीही ऐतिहासिक पार्श्वभूमी व महत्त्व नसलेली सदरील वाघ्या कुत्रा समाधी नामक संरचना हे दुर्गराज रायगडवरील अतिक्रमण असून राज्य शासनाच्या धोरणानुसार 31 मे 2025 अखेरीपर्यंत सदरील अतिक्रमण श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळावरून व दुर्गराज रायगड वरून कायमस्वरूपी हटविण्यात यावे, याकरिता मुख्यमंत्री महोदयांकडे पत्र लिहून मागणी केली. भारतीय पुरातत्व विभागाच्या धोरणानुसार 100 वर्षांहून अधिक पुरातन असलेली संरचना संरक्षित स्मारक म्हणून गणली जाते. त्यामुळे वाघ्या कुत्रा समाधी संरचनेस १०० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच विहित कालमर्यादेत ही संरचना हटविणे अत्यावश्यक आहे.



## द•ख•ल

### विद्यार्थ्यांनी घेतली पाणी बचतीची शपथ
### विवेकानंद विद्यालयात जलदिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी :- महेश राऊत**



सेलू शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद विद्यालयात जागतिक जलदिन २२मार्च रोजी साजरा करण्यात आला.पाण्याचा अयोग्य ,अविचारी व अतिवापर होत असल्याने पाण्याची समस्या जगाला भेडसावत आहे.पाणी हे जीवन आहे असे असले तरी पाण्याचे संकट जाणवत आहे .भविष्यात पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होण्याची शक्यता आहेअशी परिस्थिती निर्माण झाली आहे.या संकटाचा सामना करण्यासाठी ,पाणी बचतीचा संदेश देण्यासाठी विवेकानंद विद्यालयात जलदिन साजरा करण्यात आला. सहशिक्षक विजय चौधरी यांनी विद्यार्थ्यांना जलप्रतिज्ञेद्वारे पाण्याचे महत्व समजावून सांगितले.विद्यार्थ्यांनी पाणी बचतीचे संदेश फलक तयार केले.जल है तो कल है अश्या घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या.

### चांभार्ली ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी शेकापचे
**स्वप्निल जगन जांभळे, प्रीतम म्हात्रे यांनी दिल्या शुभेच्छा**

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



शेतकरी कामगार पक्षाचे चांभार्ली ग्रामपंचायत सदस्य स्वप्निल जगन जांभळे यांची चांभार्ली ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली त्याबद्दल त्यांचे शेकाप नेते प्रितम जे एम म्हात्रे यांनी अभिनंदन केले.

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांचा असलेला कामांचा अनुभव यापुढे ग्रामपंचायतीला नक्कीच उपयुक्त ठरेल आणि विकासाची कामे यापुढे चांभार्ली ग्रामपंचायत मधील मार्गी लागतील. त्यांच्या पुढील कारकीर्द साठी त्यांना शेकाप नेते प्रितम जे एम म्हात्रे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी शेकाप नेते प्रितम जे एम म्हात्रे यांच्यासोबत संतोष जंगम (मा. उपनगराध्यक्ष खालापूर), श्री. जगदीश पवार (पंचायत समिती सदस्य), श्री. दत्ता जांभळे (मा. सरपंच चांभार्ली), कु. रोहीत घरत (मा. उपसरपंच कसळखंड), श्री. सचिन मते (मा. उपसरपंच चौक), श्री. मिलिंद मुंढे, श्री. निखिल ढवळे, सरपंच, सदस्य, ग्रामसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

### नांदेडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस भव्य पक्ष प्रवेश सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**




**नांदेड** - राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचा भव्य पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी राज्याचे माजी गृहराज्यमंत्री, नांदेडचे माजी खासदार श्री.भास्करराव पाटील खतगावकर, नांदेड महानगरपालिका माजी महापौर आणि माजी आमदार श्री. ओमप्रकाशजी पोकर्णा,नांदेड जिल्हा परिषद आणि जिल्हानियोजन समिती माजी सदस्या डॉ. सौ.मिनलताई खतगावकर,

नांदेड महानगरपालिकेचे माजी उपमहापौर श्री सरजितसिंग गिल यांच्यासह अनेक मान्यवरांनी पक्षात जाहीर प्रवेश केला. मी सर्वांचं पक्षात मनापासून स्वागत करतो. यामुळे नांदेडमध्ये पक्ष वाढीस नक्कीच बळ मिळणार आहे. याप्रसंगी संवाद साधताना, महायुतीनं महाराष्ट्राच्या विकासाचं रथ गतिमान केलं आहे. त्याचे सारथी बनून आपण सर्वांनी राज्याच्या प्रगतीत आपला हातभार लावायचा आहे. तसंच जनकल्याणाच्या कार्यात मोलाची भूमिका पार पाडायची आहे, अशा भावना व्यक्त केल्या.

### तहरिम अजिज शेख चा पहिला रोजा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



**सिल्लोड** : - पालोद येथे राहणारी तहरिम अजिज शेख (वय १० वर्ष ) हिने पवित्र रमजान महिन्यात आपल्या जिवनातील पहिला रोज ठेवला होता. तहरिम हिने आयुष्यातील पहिला रोजा ठेवल्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. तहरिम ही अजिज फारुख शेख यांची मुलगी आहे.

## सोने,चांदीच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

सध्या सोन्याच्या दराने एक लाख रुपयाकडे आगेकूच केल्याने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. सोन्याच्या दरवाढीबरोबरच चांदीचे दरही वाढत आहेत. सध्या लग्नसराईचा हंगाम जोरात सुरू आहे. दोन वर्षांपूर्वी सोन्याचा दर ६० ते ६२ रुपये इतका होता चालू वर्षात मात्र सोन्याच्या दर ८४ हजार रुपयांवर पोहोचला होता तो आता ९० हजार रुपयांवर गेला आहे.सोन्याचे दर गगनाला भिडल्याने सर्वसामान्य कुटुंबातील वधु पित्याचे बजेट एकदमच कोलमडले जात आहे. सध्या लग्नाच्या बोलचालीत हुंडयाऐवजी सोन्याचीच बोलणी होते.लग्नात आपल्या मुलीला कोणता तरी दागिना प्रेमाने घालायचा अशी इच्छा वधुपित्याची असते परंतु वाढत्या दरवाढीमुळे वधूपित्याला मात्र मोठी कसरत करावी लागत

*चौकट*

सोन्याचे दर वाढले असले तरी, आगामी लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर ग्राहकाकडून सोने खरेदी केली जात आहे. सोने चांदीच्या दरात वाढ झाली असली तरी खरेदीवर मात्र कमी प्रमाणात परिणाम झाला नाही. ज्यांच्याकडे पैसा आहे ते नागरिक बारामती, पुणे अशा मोठ्या शहराच्या ठिकाणी जाऊन सोने खरेदी करत आहेत.

**मा.अभिषेक पाटोळकर**
**अध्यक्ष, इंदापूर तालुका सराफ संरक्षण समिती**

घर पहावे बांधून आणि लग्न पहावे करून अशी आपल्याकडे म्हण आहे याचा प्रत्येय सर्वसामन्य नागरिकांना सोन्याच्या दरवाढीने अनुभवास येत आहे. गेल्या पाच वर्षात सोन्याच्या दरात ४२ हजारांची म्हणजेच दुप्पटीपेक्षा जास्त वाढ झाली आहे. सध्या सोन्याच्या दराने ९० हजारच्या टप्पा ओलाडला असून, एक लाख स्पयेकडे वाटचाल सुरू केली आहे. चांदीच्या दराही लाखाच्यापुढे गेला आहे यामुळे सर्वसामान्य गोर गरीब नागरिकांना सोने खरेदी करणे म्हणजे मोठी अवघड बाब झाली आहे. सोने चांदीच्या वाढत्या बाजारभावामुळे बहुतांश गोरगरीब नागरिकांना सोन्याचे वाढते बाजारभाव एकूणच अंगाला घामाच्या धारा फुटत आहेत. जगभरात राजकीय अस्थिरता तसेच आर्थिक अस्थिरता निर्माण झाली आहे यामुळे बहुतांश नागरिक आपल्याजवळील गंडगंज संपत्ती सुरक्षित राहावी यासाठी सुरक्षित गुंतवणूक म्हणून जगभरातील अनेक देश सोन्याला पसंती देत आहेत त्यामुळे सोन्यासह चांदीचे दरही कमालीचे वाढले आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये अनादी काळापासून सोन्याला अतिशय मोलाचे स्थान दिले जात आहे. यामुळे मुलीच्या लग्नात मुलीचे वडील आपल्या ऐपतीप्रमाणे मुलीसाठी सोन्याचे दागदागिने कसल्याही परिस्थितीत करतातच.सध्या सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहिली जाते तसेच अडचणीच्या काळात सोने गहाण ठेवून पैसे उपलब्धही होतात. वाढत्या महागाईच्या काळात सोने खरेदी करणे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत परंतु सोन्याचे दर आणखी वाढतील म्हणून ग्राहक थोडे थोडे सोने खरेदी करत आहेत.सरलेल्या वर्षात (२०२४) सोन्याचे दर उच्चांकी पातळीवर गेले होते मात्र तरीही,भारतातील नागरिकांनी ८०२.८ टन सोने खरेदी केले असल्याची माहिती जागतिक सुवर्ण परिषदेने दिली आहे. आगामी लग्नसराईचा लझसराई सोहळे मोठ्या घुम घडाक्यात उत्साहात साजरे होत आहेत.

> लोक गुंतवणूकीसाठी सुरक्षित पर्याय शोधत आहेत. सोने ही सुरक्षित गुंतवणूक असल्याचं सिद्ध झालंय.
> भारतासह आशियाई देशामध्ये सोन्याकडे मालमत्ता म्हणून पाहिलं जातं. परंतु इतर देशामध्ये सोनं ही गुंतवणूक मानली जाते.
> **मा जगदिश भालचंद्र कांबळे**
> **अध्यक्ष,पश्चिम महाराष्ट्र सराफ संरक्षण समिती**

## सिल्लोडला लोक अदालतीत २२ लाखांची वसुली

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी :-**
**योगेश पालोदकर सिल्लोड:-**



येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर येथे शनिवार दि.२२ रोजी झालेल्या राष्ट्रीय लोक अदालतीत प्रलंबित ८६ प्रकरणे निकाली काढण्यात आली यातील गुन्हा कबुली, दिवाणी दावा, बँक वसुली अशा प्रकरणात २२ लाख रुपयांची वसुली करण्यात आली.

शहरातील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर येथे शनिवार( दि.२२) रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.या लोक अदालतीचे अध्यक्षस्थानी सह दिवाणी न्यायाधीश के. टी. अढायके हे होते. या लोकादालतीत ठेवण्यात आलेल्या ३०६ प्रकरणांपैकी ८६ प्रकरणे निकाली काढण्यात आली यात ५४ गुन्हा कबुली,३ दिवाणी दावा व बँक वसुली, १३८चेक बाउन्स अशी विविध प्रकारे निकाली काढण्यात आली. या प्रकरणातून वाहतूक दंड ३१ हजार १००,बँक वसुली व इतर असे एकूण २२ लाख ९२ हजार ४८५ रुपयांची वसुली करण्यात आली. शिवाय एका विवाहित जोडप्याच्या प्रकरणात तडजोड करून देण्यात आली. या लोकअदालतीत पंच म्हणून अड जे. पी.मगर हे तर सरकारी वकील एस.एस.सपकाळ,पी.जी.वारुळे यांचे सह वकील संघाचे अध्यक्ष अड अशोक तायडे,अड इरफान पठाण,अड रवींद्र ताठे,अड जी. यू. ढोणे,अड खंडाळकर पोलीस कर्मचारी मेढे त्यांची प्रमुख उपस्थिती होती. या लोक अदालतीसाठी न्यायालयातील अधीक्षक के. आर.हिरेकर,सहअधीक्षक योगेश जामखेडकर, वरिष्ठ लिपिक आनंद सुरडकर, कनिष्ठ लिपिक एस. बी.विटोरे व इतर न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला होता.

## पनवेल येथे राष्ट्रीय लोकअदालतीत 3 हजार 68 प्रकरणे निकाली

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल जिल्हा न्यायालयात 22 मार्च रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत दाखलपूर्व आणि प्रलंबित प्रकरणांचा मोठ्या प्रमाणावर निपटारा करण्यात आला. एकूण 3 हजार 68 प्रकरणे सामंजस्याच्या आधारे निकाली काढण्यात आली, अशी माहिती जयराज डी. वडणे, जिल्हा न्यायाधीश १ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, पनवेल, रायगड यांनी दिली. पनवेल न्यायालयात एकूण 23 हजार 294 प्रकरणे लोकअदालतीसमोर ठेवण्यात आली होती. यामध्ये 18 हजार 939 वादपूर्व प्रकरणे आणि 4 हजार 355 न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांचा समावेश होता. लोकअदालतीतून झालेल्या समेटामुळे 1 हजार 124 वादपूर्व प्रकरणे आणि 1 हजार 944 प्रलंबित खटल्यांचा तडजोडीच्या माध्यमातून निपटारा करण्यात आला. या प्रक्रियेद्वारे संबंधित पक्षकारांना आणि विविध संस्थांना एकत्रित 6 कोटी 15 लाख 2 हजार 790 रुपयांची



तडजोडीची रक्कम मिळवून देण्यात आली. पनवेल जिल्हा न्यायालयात लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी सात कक्ष स्थापन करण्यात आले होते. यामध्ये प्रमुख न्यायाधीश, पंच सदस्य आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या लोकअदालतीत जयराज डी. वडणे (जिल्हा न्यायाधीश 1 व अति. सत्र न्यायाधीश, पनवेल), ए. एस. बडगुजर (3 रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर), ए. आर. गुन्नाल (सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर), के. एम. सोनवणे (2 रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर), एस. व्ही. साळवी (3 रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर), पी. सी. बिडकर (4 थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर) आणि डी. एम. वाघमारे (6 वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर) यांनी कक्ष प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली. पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष अड. मनोज भुजबळ, सचिव अड. प्रल्हाद खोपकर आणि संपूर्ण कार्यकारिणी मंडळाने सहकार्य केले. या लोकअदालतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत व्हिडिओ कॉलच्या माध्यमातूनही खटले सोडवण्यात आले. त्यामुळे अनेक पक्षकारांना न्यायालयात प्रत्यक्ष येण्याची आवश्यकता भासली नाही. यावेळी दिपाली म्हात्रे (सहाय्यक अधीक्षक, जिल्हा न्यायालय), हेमंत आंबेतकर, अविनाश चंदने, शैलेश कोंडसकर (विधी स्वयंसेवक, जिल्हा न्यायालय, पनवेल) तसेच इतर न्यायालयीन कर्मचारी यांचा मोलाचा सहभाग राहिला. याशिवाय, 6 दांपत्यांचे कौटुंबिक वाद मिटवून त्यांनी पुन्हा एकत्र राहण्याचा निर्णय घेतला, ही लोकअदालतीची विशेष बाब ठरली.

### सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन तात्काळ करा... अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार - पाडेवार

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

दिनांक 23 परतूर येथील नगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन मागील 7 महिन्यांपासून थकले असून वेतनाअभावी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे तसेच अनेक अडचणींचा सामनाही करावा लागत आहे.सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन तात्काळ करण्यात यावे अन्यथा नगरपालिकेसमोर तीव्र आंदोलन छेडू असा इशारा सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी दिला आहे. यासंदर्भात बोलताना पाडेवार यांनी सांगितले की, नगरपालिकेच्या स्वच्छता विभागात जवळपास 100 कर्मचारी कार्यरत आहेत. हे सर्व कर्मचारी कंत्राटी पद्धतीवर दररोज इमानेइतबारे शहर स्वच्छतेचे काम करतात. परंतु या सर्व कर्मचाऱ्यांना मागील 7 महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. वेतन नियमितपणे देण्यात यावे अशी मागणी कर्मचारी वेळोवेळी करतात. मात्र त्यांच्या या मागणीकडे नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष देत नाहीत. त्यामुळे वेतन रखडले आहे. वेतन नसल्याने सदरील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. उधारीवर आणलेल्या किराणा सामान तसेच भाजीपाल्याची बिलेही आता थकली आहेत. वेतन नसल्याने आता या कर्मचाऱ्यांना किराणा सामान तसेच इतर कुठल्याही वस्तू दिल्या जात नाहीत. परिणामी वेतनाअभावी जीवन जगावे तरी कसे असा प्रश्न कर्मचाऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.वाढती महागाई, वेतनाअभावी निर्माण होत असलेल्या विविध अडचणीचा विचार करून नगरपालिकेने स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन तात्काळ करावे अन्यथा सर्व कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन नगरपालिका कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडणार असल्याचे सामाजिक कार्यककर्ते अर्जुन यांनी सांगितले.

## आरोपींवर हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**


टेंभोंडे येथील 24 वर्षीय जीवन पाटील याच्यावर हल्ला केल्याप्रकरणी दोन आरोपींवर हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्याची मागणी अन्याय अत्याचार निर्मूलन समितीने केली आहे. यात पाटील हा जखमी होऊन त्याला 37 टाके पडले आहेत. पोलिसांनी दोघांवर मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. 21 मार्च रोजी जीवन पाटील हा गाडीवरून नवीन पनवेल येथून जात होता. यावेळी दुसऱ्या गाडीने कट मारल्याने त्याची मोटरसायकल खाली पडली. यावेळी त्याला विचारणा केली असता तो नवीन पनवेल सेक्टर 4 येथील शोरमा दुकानात गेला आणि त्या अनोळखी इसमाने चाकू घेऊन जीवनच्या अंगावर धावून आला. चाकू मारण्याचा प्रयत्न करत असताना तो मारून टाकतो असं धमकावत होता. यावेळी चाकू मानेवर मारत असताना तो घाव वाचवण्यासाठी जीवनने हात पुढे केला आणि तो घाव हातावर लागला. यावेळी शोरुम दुकानाचा मालक ही त्याला मारण्यासाठी चिथावणी देत होता. जीवन याच्यावर पॅनासिया रुग्णालय, नवीन पनवेल येथे उपचार करण्यात आले. खांदेश्वर पोलिसांनी केवळ मारहाणीचा गुन्हा दाखल केला असल्याचा आरोप जीवन पाटील यांनी केला. या प्रकरणी विवेक आणि शोरमा मालक या आरोपींवर हत्येचा प्रयत्न केल्याचा



गुन्हा दाखल करणे आवश्यक असल्याचे अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे कोकण विभागीय अध्यक्ष संतोष चाळके, बीपी लांडगे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृह सचिव विभाग, पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त याना केलेल्या पत्र व्यवहारात म्हटले आहे.

### अरणवीहरा येथे बिबट्याचा श्वानावर हल्ला
**ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण**

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**



आष्टी ता लुक्यातील शेडाळा वेलतूरी अरणविहरा सावरगाव या परिस रामध्ये बिबट्याचा वावर असल्याचे अनेकवेळा निदर्श ना स येते. अनेक शेतक ऱ्यांच्या शेळ्या वासरे यांच्यावर बिबट्या हल्ला करून फडशा पाडत आहे . 21 मार्च रोजी पहाटेच्या सुमारास आष्टी तालुक्यातील अरणविहरा गावातील मसु दगडू शिरसाठ यांच्या घरासमोरील अंगणात जनावराच्या गोठ्याजवळ पाळीव कुत्रा बसला होता याच परिसरात बिबट्याचा वावर असल्याने अनेकदा समोर आले आहे या पाळीव कुत्र्यावर बिबट्याने अचानक हल्ला चढवत तोंडात पकडून नेल्याची घटना 21 रोजी पहाटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पहाटेच्या सुमारास राहत्या घरासमोरून बिबट्याने कुत्र्यावर हल्ला चढवून जबड्यात पकडून नेण्याची घटना घडल्यामुळे व ती सीसीटीव्ही मध्ये घटना रेकॉर्ड झाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भेतीचे वातावरण निर्माण झाले आहे या बिबट्याचा लवकरात लवकर वनविभागाने बंदोबस्त करावा अशी मागणी या परिसरातील गावातील लोकांकडून होत आहे. या परिसरातील गर्भगिरी डोंगर रांगेमध्ये नेहमीच बिबट्याचे दर्शन होत असल्याचे लोकांकडून बोलले जात आहे.

### नील हॉस्पिटल येथे आयोजित उमंग उन्हाळी शिबिराला प्रचंड प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**



DSRF, ब्रह्मा कुमारी, स्वरसंस्कार म्युझिक अँकडमी, आनंद आंबेश पाठशाळा आणि नील हॉस्पिटल यांनी राजयोग ध्यान केंद्र, नील हॉस्पिटल, नवीन पनवेल येथे आयोजित केलेल्या उमंग उन्हाळी शिबिराला मुलांचा व पालकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. मुलांनी खेळ, शारीरिक योग आणि ध्यान, क्रियाकलाप आधारित शिक्षण, रेखाचित्र, हस्तकला, गायन आणि इतर क्रियाकलापांचा आनंद घेतला. नील हॉस्पिटलच्या प्रख्यात स्त्रीरोगतज्ज्ञ कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ञ बीके डॉ. शुभदा नील, डॉ कविता चौतमोल महापौर पनवेल, सौ शंकुतला ठाकुर, अर्चना परेश ठाकुर, डॉ स्वाती लिखते प्रसिद्ध बालरोगतज्ञ, सौ मं गला बिराजदार, अँड सुरेखा भुजबळ स्वरसंस्कार म्युझिक अँकडमी, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मंगला गडमुळे, सौ अक्कलकोटे, नाजनिन पालेकर, पिंकी जैन आनंद पाठशाला, प्रभा सिन्हा, पत्रकार मिलिद खारपाटील, जनहित संवर्धक मंडळाचे नरेंद्र गुरव, कृष्णा तिवारी, डॉ नरेंद्रकुमार दसरे व इतर मान्यवर यांचे विशेष मार्गदर्शन व आशीर्वाद मुलांना लाभले.

द • ख • ल

## परतूर रेल्वे प्रोटेक्शन फोर्सची इमारत उद्घाटनाच्या प्रतिक्षेत.. रेल्वेला मुहूर्त कधी मिळणार ?

**दैनिक युवक आधार**
**परतूर -जालना(अशोक ठोके)**



जालना जिल्ह्यातील परतूर रेल्वे स्थानक हे अत्यंत वर्दळीच रेल्वे स्थानक आहे या स्थानकातून हजारो प्रवासी मुंबई, पुणे, नांदेड, छत्रपती संभाजी नगर, सिकंदराबाद,नाशिक तसेच भारतात सगळीकडेच प्रवास करत असतात यामधून रेल्वेला तिकिटांच्या माध्यमातून फायदा देखील खूप होत आहे. प्रवाशांची सुरक्षा ही रेल्वेच्या रेल्वे प्रोटेक्शन फोर्सची व जी.आर. पी.ची आहे. परतूरचा मागील इतिहास पहिला तर हे अत्यंत ब्लॅक स्पॉट स्थानक आहे येथे या आधी खूप गुन्हे घडलेले आहेत. त्यातच येथे रेल्वे प्रोटेक्शन फोर्सची अत्यंत दयनीय अवस्था आहे यांना राहण्यासाठी बरोबर बॅरेक व कामकाज करण्यासाठी व्यवस्थित असे ऑफिस देखील नाही, पावसाळ्यात तर त्यांचे ऑफिस व बॅरिक हे थोडा जरी पाऊस आला तर गळत राहतं अशा अवस्थेत हे पोलिस कर्मचारी काम करीत आहेत त्यातच परतूर रेल्वे स्थानकावर पुरेसा कर्मचारीवर्ग देखील रेल्वे प्रोटेक्शन फोर्स मध्ये नाही, या रेल्वे स्थानकात एका शिफ्टला तीन पोलिस कर्मचारी असे तीन शिफ्ट मध्ये नऊ कर्मचारी व दोन अधिकारी अशी गरज असताना येथे रेल्वेने दिलेले एक अधिकारी व चार कर्मचारी हे देखील कर्मचारी नाहीत येथे फक्त एक अधिकारी व दोन कर्मचाऱ्यांवरच बारा- बारा घंटे ड्यूटी करून हे कर्मचारी रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळत आहेत. जी.आर.पी. चे तर एकच कर्मचारी आहे.पुरेसा कर्मचारी वर्ग रेल्वेने दिला तर ते अजून चांगल्या प्रकारे काम करू शकतील तसेच रेल्वे प्रोटेक्शन फोर्सची इमारत तयार होऊन सहा महिने झालेत तरी उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे या इमारतीचे उद्घाटन कधी होणार? असा प्रश्न रेल्वे प्रवाशांना पडला आहे, या इमारतीचे उद्घाटन लवकरात लवकर करून पुरेसा पोलिस कर्मचारी वर्ग रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी देण्यात यावा अशी मागणी रेल्वे प्रवाशांच्या वतीने करण्यात येत आहे.

## भारतीय रिपब्लिकन पॅंथर मोर्चा द्वारा संपूर्ण देशभर आंदोलन छेडण्याचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

संपूर्ण विश्वातील बौद्ध धर्मीय बांधवांचे पवित्र श्रद्धास्थान असलेले भारतातील बिहार राज्यात असलेले गया स्थित महाबोधी बुद्ध विहार हे बौद्ध बांधवांच्या पूर्णता त्वरित ताब्यात देण्यात यावे तसेच बिहार राज्य सरकारने बोध गया टेम्पल ऍक्ट 1949 तातडीने रद्द करण्यात यावा. बोधगया येथील महाबोधी बुद्ध विहार मध्ये ब्राह्मण पुरोहिता कडून होणारे वैदिक कर्मकांड या ठिकाणी तातडीने बंद करण्यात यावेत अशी मागणी भारतीय रिपब्लिकन पॅंथर मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. दादासाहेब पी. बी. खडसे यांनी भारताचे महामहीम राष्ट्रपती आणि भारताचे विद्यमान माननीय पंतप्रधान, बिहार राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांना पाठविलेल्या एका निवेदनातून केली आहे. महाबोधी बुद्ध विहार हे बौद्ध बांधवांचे पवित्र धर्मस्थळ आहे. ब्राह्मणांचा महाबोधी बुद्ध विहारावर कोणताच अधिकार नाही, ब्राह्मण पुरोहितांची महाबोधी बुद्ध विहारांमध्ये घुसखोरी बंद करावी आणि बौद्ध बांधवांना न्याय द्यावा अशी मागणी भारतीय रिपब्लिकन पॅंथर मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. दादासाहेब पी. बी. खडसे यांनी पाठवीलेल्या निवेदनातून केली आहे. अन्यथा भारतीय रिपब्लिकन पॅंथर मोर्चा द्वारा बौद्ध बांधवांच्या न्याय व अधिकारासाठी संपूर्ण देशभर तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल असा इशारा भारतीय रिपब्लिकन पॅंथर मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. दादासाहेब पी. बी. खडसे, भारतीय रिपब्लिकन पॅंथर मोर्चाचे राष्ट्रीय सचिव श्री. मनोज ढवळे, श्री.आनंदराव हिवराळे गुरुजी, श्री.प्रकाशदीप वानखडे, श्री.सुरेश सोनावणे, भारतीय रिपब्लिकन पॅंथर मोर्चाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष श्री. प्रकाश पवार, भारतीय रिपब्लिकन पॅंथर मोर्चाच्या मुंबई प्रदेश महासचिव सौ. स्वप्नातीलताई सोनावणे पात्रे यांनी दिला आहे.

## आला वसंत सजून

आला हो वसंत द्वारी,
गोष्ट ऐका नवी न्यारी!
नवा शालू , नवी गाणी,
पक्षी गाती गोड गाणी!!१!!

वस्त्र नेसले सोनेरी,
धरणी झाली नवरी!
फुलला मोगरा जाई,
बघा आता नवलाई!!२!!

पाने नाचती आनंदी,
फुलांनी सजली वादी!
मनात उमेद जागी,
वसंताची आली सादी!!३!!

बहरली वनराई,
मनोहरी फुलराई!
गंधारल्या आता वाटा,
वाऱ्यासंग नाचे लाटा!!४!!

निसर्ग उत्सव आला,
वसंतात बहरला!
वसुंधरेवर खास,
आनंद सोहळा झाला!!५!!

... प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर
( छत्रपती संभाजीनगर)

# पवनचक्की कंपन्यांनी शेतकऱ्यांना मावेजापोटी दिलेले धनादेश वटलेच नाहीत.

### बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील प्रकार ; जिल्हा प्रशासनाची भूमिका म्हणजे कुंपनच शेत खातंय...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील रिन्यु ग्रीन पवनचक्की कंपनीने शेतकऱ्यांना मावेजा पोटी दिलेले धनादेश वटलेच नसल्याने व विचारणा केल्यानंतर आधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत टाळाटाळ करत असल्याने शेतकऱ्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरूच असुन जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाची भूमिका शेतकऱ्यांना न्याय भुमिकेतुन संरक्षण देण्याऐवजी पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करण्याची असुन कुंपनच शेत खात असेल तर दाद कोणाकडे मागायची अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे. या विषयी सविस्तर माहिती अशी की बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतजमिनीत रिन्यु ग्रीन एम.एच. पी. वन.प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली या कंपनीने पवनचक्की उभारली आहे. पवनचक्कीची उभारणी करताना काही क्षेत्र पवनचक्की भागात आणि काही क्षेत्र रस्ता शेतातुन गेल्याने पवनचक्की कंपन्यांच्या आधिकाऱ्यांनी पंजाब नॅशनल बँकेचे धनादेश खाते क्रमांक ७८३५००२१००००२८६४ वरून शेतकरी अंबादास रामकिसन ढास यांना १,४९,८१३ रूपये चेक नंबर ५२३५२८, शेतकरी सुभाष रामकिसन ढास यांना १,३८,०६३ चेक नंबर ५२३५२९ आणि शेतकरी शेषेराव रामकिसन ढास यांना १,३८,०६२ रूपये चेक नंबर ५२३५३० अशी एकुण रक्कम ४,२५,९३८ रुपये किंमतीचे धनादेश वटलेच नाहीत. संबंधित प्रकरणात पवनचक्की कंपन्यांच्या आधिकाऱ्यांना विचारणा केली असता अगोदर उडवाउडवीची उत्तरे दिली असुन आता फोन घेण्यास सुद्धा टाळाटाळ करत असल्याची तक्रार शेतकरी अंबादास ढास यांनी केली आहे.

**जिल्हा प्रशासनाची भुमिका म्हणजे कुंपनच शेत खातंय, पवनचक्की कंपन्यांची पाठराखण तर पिडीत शेतकऱ्यांना वालीच नाही.**
महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०२३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संनियंत्रण समित्यांची स्थापना केली असुन पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे, जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे.पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य कारवाई करणे. शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्या मध्ये समन्वय ठेवणे आदि त्यांची कामे असुन जिल्हाधिकारी समितीचे अध्यक्ष तर पोलिस अधीक्षक सदस्य आहेत. मात्र या समित्या केवळ कागदावर कार्यरत असुन जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक केवळ पवनचक्की कंपन्यांचीच पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले असुन जिल्हा प्रशासनाची भूमिका कुंपनच शेत खातंय अशी झाली आहे.
**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**(सामाजिक कार्यकर्ते)**

महिनाभरापूर्वी आमच्या शेतातील ज्वारीच्या उभ्या पिकातुन सहमती शिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी, पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक केली. तेव्हा तुम्हाला नुकसान भरपाई देण्यात येईल असे सांगितले. परंतु पवनचक्की प्रकल्प उभारल्यानंतर अद्याप नुकसान भरपाई दिलीच नाही. जवळपास ८०० कडबा आणि ज्वारीची कणसे धुळीमुळे खराब झाली आहेत. अगोदर दिवसातुन ४-५ वेळा मनधरणी करण्यासाठी येणारे अधिकारी आता फोन सुद्धा उचलत नाहीत. या प्रकरणी आज सोमवारी जिल्हाधिकारी बीड व पोलीस अधीक्षक बीड यांना लेखी तक्रार करणार आहे.
**संदिप ढास**
**(शेतकरी)**



**उभ्या ज्वारीच्या पिकातुन गाड्या घातल्या कडब्याचे नुकसान झाले त्याचीही भरपाई अद्याप दिलीच नाही.**

## बाप माणूसः प्राध्यापक वसंत हंकारे साहेब"

**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

"बाप जिवंत करणारा माणूस"
काही माणसं जगतात स्वतःसाठी, तर काही माणसं हजारो लोकांसाठी. काहींच्या पोटात भुकेची आग असते, तर काहींच्या काळजात इतरांची भूक मिटवण्याची जाणीव असते. समाजात अशी माणसं विरळाच असतात, जी स्वतःच्या आयुष्याला एका ध्येयासाठी समर्पित करतात. अशाच एका असामान्य व्यक्तीचे नाव म्हणजे प्राध्यापक वसंत हंकारे साहेब—एक असा माणूस, जो हजारो अनाथ मुलींचा आधार बनला आहे, ज्याच्या उरात बापाच्या मायेची ऊब आहे आणि ज्याच्या शब्दांत एक जग उभं राहण्याची ताकद आहे.

**"हजारो अनाथ मुलींचा बाप"**
"बेटी बचाओ" ही फक्त घोषणा राहिली असताना, प्राध्यापक वसंत हंकारे साहेबांनी ती कृतीत आणली. समाजाने टाकलेल्या, संकटात सापडलेल्या, अनाथ झालेल्या मुलींना त्यांनी दत्तक घेतलं, त्यांच्या पाठीशी बाप म्हणून उभं राहिले. त्यांनी केवळ त्यांच्या पोटाची भूक नाही मिटवली, तर त्यांच्या आत्म्याला जिवंत केलं. शिक्षण, संस्कार, स्वाभिमान, आणि आत्मनिर्भरतेचा मंत्र देत या मुलींचे आयुष्य त्यांनी घडवले.
"एका मुलीला वाचवलं म्हणजे एक संपूर्ण पिढी वाचवली!" हा विश्वास बाळगून त्यांनी मुलींना योग्य मार्ग दाखवला, त्यांच्या हातात पुस्तक दिलं, त्यांच्या स्वप्नांना पंख दिले. "माझ्या मुली कोणत्याही गोष्टीला घाबरणार नाहीत, त्या आत्मनिर्भर बनतील"—हे त्यांचं ब्रीदवाक्य आहे.

**"त्यांच्या शब्दांतली ताकद"**
प्राध्यापक वसंत हंकारे साहेब जिथे जातात, तिथे त्यांच्या शब्दांची जादू घडते. त्यांनी अनेक मुलींच्या हृदयात प्रेरणेचे बीज पेरले. "तुम्ही कुणाच्या प्रेमात पडण्याआधी तुमच्या स्वप्नांच्या प्रेमात पडा," असा संदेश देत त्यांनी अनेक




मुलींना वाईट संबंधांतून वाचवलं.
"स्वतःच्या पायावर उभं राहा, कारण जग पायाखालची जमीन काढण्यासाठीच बसलेलं असतं!"—असं ते मुलींना सांगतात.
त्यांची प्रत्येक गोष्ट ऐकताना अंगावर शहारे येतात, डोळ्यांत अश्रू उभे राहतात. एका बापाने आपल्या हजारो मुलींसाठी घेतलेला हा संकल्प म्हणजे केवळ एक सामाजिक कार्य नाही, तर ही आहे एक महायज्ञ!

"लव्ह जिहादः सर्व मुलींसाठी धोका"
आजच्या काळात केवळ अनाथ किंवा गरीब मुलीच नव्हे, तर सर्वच मुलींसाठी मोठं संकट उभं आहे—"लव्ह जिहाद!"
खोट्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवून मुलींना धर्मांतरासाठी, शोषणासाठी आणि अत्याचारासाठी लक्ष्य केलं जात आहे. देशभरात अनेक अशा घटना समोर येत आहेत, जिथे मुलींना फसवून त्यांच्या आयुष्याची राखरांगोळी केली जाते. कधी फ्रीजमध्ये तुकडे करून टाकलेल्या, कधी पेट्रोल टाकून जाळलेल्या, तर कधी अनेक चाकूचे घाव देऊन निर्दयपणे मारलेल्या घटनांनी देश हादरला आहे.
हे विषारी षडयंत्र थांबवण्यासाठी समाजाने जागरूक होणं अत्यावश्यक आहे. प्राध्यापक वसंत हंकारे साहेबांसारख्या समाजसुधारकांनी मुलींना सुरक्षिततेचा आधार दिला असला तरी, यासाठी एक राष्ट्रीय स्तरावरील कठोर कायदा लागणार आहे.

"लव्ह जिहाद विरोधी कठोर कायदा आवश्यक!"
लव्ह जिहादसारख्या घटनांमुळे कित्येक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. या संकटाला आळा घालण्यासाठी केंद्र सरकार आणि सर्व राज्य सरकारांनी एकसंध, कठोर आणि परिणामकारक कायदा करावा.
या कायद्याअंतर्गत—
खोट्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवून धर्मांतर करणाऱ्यांना कठोर शिक्षा द्यावी.
पीडित मुलींसाठी विशेष संरक्षण आणि मदत केंद्रे स्थापन करावीत.
अशा प्रकरणांमध्ये जलदगती न्याय प्रक्रिया राबवावी.
मुलींच्या पालकांना आणि समाजाला जागरूक करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती अभियान राबवावं.
जर सरकारने या दिशेने तातडीने पावले उचलली नाहीत, तर अनेक निरपराध मुलींचं आयुष्य उद्ध्वस्त होईल.

**"समाजाला शिकवण"**
आज आपण प्राध्यापक वसंत हंकारे साहेबांकडून शिकायला हवं—आपल्या घरच्या मुलींना केवळ स्वातंत्र्य देणं पुरेसं नाही, तर त्यांना योग्य मार्गदर्शन, आत्मसन्मान, आणि जबाबदारीचं भान देणं गरजेचं आहे. मुलींनीही सोशल मीडियाच्या आहारी न जाता, बाहेरच्या जगाच्या आकर्षणात न पडता स्वतःची किंमत ओळखायला हवी.
जर समाजात अजूनही असे बाप निर्माण झाले, जर प्रत्येक व्यक्तीने एका तरी मुलीच्या जीवनासाठी काहीतरी केलं, तर हा समाज सुरक्षित आणि सुंदर बनेल.

**"एक बाप, हजारो लेकी!"**
प्राध्यापक वसंत हंकारे साहेब फक्त एक व्यक्ती नाहीत, ते एक विचारधारा आहेत—एक बापाच्या जबाबदारीची जाणीव आहेत. त्यांच्यासारखी माणसं असतील, तर हजारो मुली वाचतील, सुरक्षित होतील, आत्मनिर्भर बनतील.
त्यांचा हा प्रवास लाखोंना प्रेरणा देणारा आहे, आणि तो एका चांगल्या भविष्याचा मार्ग दाखवणारा आहे. समाजाला अशीच माणसं हवीत—"बाप जिवंत करणारी!"

## महाबोधी विहार बडवेमुक्त आंदोलन समर्थनार्थ २५ मार्च रोजी शांतता रॅलीचे भा. बौ. महासभा आणि सर्व आंबेडकरी पक्षांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**कल्याण /रशीद शेख**

भारतीय बौद्ध महासभा शहापूर तालुकाच्या वतीने रविवार दिनांक १६ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता शासकीय विश्रामगृह शहापूर येथे बोधगया, बुद्ध विहार मुक्ती आंदोलन यास पाठिंबा देऊन शहापूर तालुक्यात शांतता रॅलीचे आयोजन करण्या बाबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. सदर बैठकीस सर्व शहापूर तालुका पदाधिकारी, तमाम आंबेडकरी पक्ष, संस्था संघटना, पाठिंबा देण्यासाठी फुले शाहू आंबेडकरी विचारवंत, हितचिंतक उपस्थिती होते.
महाबोधी महाविहार (बोधगया, बिहार) हे पवित्र बौद्ध धर्मस्थळ असून, ते बौद्ध समाजाच्या ताब्यात द्यावे, अशी बौद्ध समाजाची मुख्य मागणी आहे. सध्या हे स्थळ बी. टी. ॲक्ट १९४९ अंतर्गत हिंदू ब्राह्मण्यवाद्यांच्या ताब्यात आहे, जे बौद्ध समाजाच्या धार्मिक अधिकारांवर अन्यायकारक आहे. बोधगया येथे १७ सप्टेंबर २०२४ पासून आंदोलनाची सुरुवात झाली असून त्या आंदोलनाला समर्थन दर्शविण्यासाठी, २५ मार्च २०२५ रोजी शहापूर तहसील कार्यालयावर शांतता रॅली धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे आंदोलन भारतीय बौद्ध महासभा आणि शहापूर तालुक्यातील सर्व आंबेडकरी पक्षीय, संघटना यांच्या मार्गदर्शन आवाहना नुसार आयोजित करण्यात आले आहे. बोधगया महाबोधी विहार बडवे मुक्त आंदोलन समर्थनार्थ शांतता रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे भारतीय बौद्ध महासभेच्या आणि सर्व आंबेडकरी पक्षांच्या बौद्ध बांधवांना आपली ताकद दाखवण्याचे अहवाहन करण्यात आले आहे.



# कलश इंटरटेनमेंट तर्फे अस्तित्व नारी सन्मान पुरस्कार प्रदान सोहळा २०२५ जल्लोषात साजरा.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

सिने अभिनेत्री प्रिया बेर्डे यांची विशेष उपस्थिती.

कलश इंटरटेनमेंट तर्फे अस्तित्व नारी सन्मान पुरस्कार २०२५ हा सोहळा श्लोक पाटील व कल्पना सुर्वे यांच्या संकल्पनेतून त्यांनी साकारलेल्या या सन्मान पुरस्काराचे वितरण मोठ्या जल्लोषात साजरे झाले. उरण मधील सिल्वर ओक रिसॉर्ट येथे शनिवार दिनांक २२ मार्च २०२५ रोजी हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी या भव्य दिव्य कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सिने अभिनेत्री प्रिया बेर्डे, शैलजा घरत, राष्ट्रवादीच्या भावना घाणेकर व माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे यांच्यासह इतर मान्यवर महिलाही उपस्थित होत्या. आलेल्या मान्यवरांचे लेझीम च्या गजरात स्वागत झाले. दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. श्लोक पाटील आणि कल्पना सुर्वे यांनी महिला दिनाच्या निमित्ताने महिलांनी महिलांचा केलेला हा गौरव आहे, त्यांच्या जीवनात आनंदी क्षण दिले आहेत. महिलांनी केलेल्या उल्लेखनीय कामाची पोचपावती, त्यांना प्रोत्साहन,तसेच इतर महिलांना त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळावी, प्रत्येक महिलेला तिच्यात असलेल्या सुप्त गुणांना प्रोत्साहन



देऊन, त्यांना गौरवीत करणे, या उदात्त हेतूने या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख पाहुण्यांचे मनोगतातअभिनेत्री प्रिया बेर्डे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, नारी आता अबला नाही तर ती आता प्रत्येक क्षेत्रात पुढे येऊन त्या क्षेत्रात नावलौकिक कमावत आहे. आज ती उंबरठ्याच्या बाहेर येऊन स्वताला सिद्ध करत आहे. येथील या कर्तुत्ववान महिलांना भेटून आनंद झाला आहे. उरण मधील एवढ्या महिलांची माझी ओळख होत आहे हे मी माझे भाग्य समजते. शैलजा घरत यांनीही आपल्या मनोगतात महिलांचे मनोबल वाढविले.

कोणत्याही शुभकार्यात कलश मांगल्य जपण्याचे शुभ प्रतीक आहे.पाण्याने भरलेला कलश त्यावर कल्पवृक्ष हे आपल्या संस्कृतीचे पावित्र्य आहे. त्यामुळे असा कलश सन्मानचिन्ह म्हणून देऊन प्रत्येक महिलेला आठवणीत रहाणारी हि अमुल्य भेट आहे. सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र एक सुंदर रोपट व देऊन विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या एकूण २३ महिलांना गौरवण्यात आले. गौरवीत महिलांनी या सोहळ्या विषयी कृतज्ञता व्यक्त केली. व सर्वांचे आभार मानले. कलश इंटरटेनमेंटच्या संस्थापक श्लोक पाटील व सहसंस्थापक कल्पना सुर्वे या म्हणाल्या की, हा आमचा दुसरा सीजन आहे आम्ही दरवर्षी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देऊन प्रोत्साहित करणार ,जास्तीत जास्त महिलांना या सन्मानास पात्र बनवणार. यावेळी लोकशाही, आयबीएन लोकमत, झी २४ तास यासारखे प्रसिद्ध वाहिन्यांचे प्रतिनिधी हजर होते. विविध वृत्तपत्राचे पत्रकार, डॉक्टर्स, विविध क्षेत्रातील मान्यवर हजर होते. शेकापच्या प्रितम म्हात्रे यांनीही यावेळी आपली उपस्थिती दर्शविली. व महिलांना प्रोत्साहन दिले. यावेळी आलेल्या पाहुण्यांनाही सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. जे. एस. के. ग्रुपने डान्स सादरीकरण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याचप्रमाणे लावणी सम्राट अश्मिक कामथे यांनी लावणींची अदाकारी सादर करून टाळ्यांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक शेट्टी यांनी रंगतदार आणि सुंदररीत्या केले. आभाराच्या सुमनांची उधळण होऊन ,कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमासाठी मुख्य समन्वयक व गिफ्ट पार्टनर स्वप्ना महाडिक, आरती ढोले व्हेन्यु पार्टनर व बाकी सहकारी यांचे योगदान फार मोलाचे आणि मोठे आहे.यां सर्वांनी मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

**कलश इंनटरट्रेंमेंट तर्फे अस्तीत्व नारी सन्मान च्या पुरस्कार कर्त्यांची नावे पुढीलप्रमाणे ;-**
१)तृप्ती भोईर (बेस्ट जर्नालिस्ट
२)संगीता ढेरे (सामाजिक कार्य)
३) मंजिरी प्रभुलकर (रांगोळी कलाकार)
४)निवेदिता मोरे (मेकअप आर्टिस्ट)
५)मानसी कदम (वैद्यकीय सेवा)
६)अनु पाटील (स्वयंसहायता बचत गट)
७)दया परदेशी (गर्भसंस्कार आणि आयुर्वेद)
८)उमा अहुजा (बाल शिक्षण आणि समाज कल्याण)
९) सोमिया सिंग (रायझिंग इंडस्ट्री)
१०)रचना चक्रवर्ती (शैक्षणिक)
११)विजया तायडे (सोसायटी रजिस्ट्रेशन )
१२)चैताली म्हात्रे (बेस्ट टीचर)
१३)ममता मोरे (ब्युटी इंटरप्रिंनीयर)
१४)वनिता पाटील (बेस्ट कोरिओग्राफर)
१५)प्रतिभा पाटील (सोशल आयकॉन)
१६)संगीता साळुंखे (आध्यात्मिक सेवा)
१७)कल्याणी ठाकूर (एस्पीरिंग इंटरप्रिनीयर)
१८) वर्षा कुडव (आयुर्वेद)
१९)संगीता जाधव (सामाजिक कार्य )
२०)आकांक्षा भोईर (बेस्ट सिंगर)
२१)सविता डेरे (वैद्यकीय सेवा)
२२)स्वाती ठक्कर ( अक्युप्रेशर आणि अक्युपंक्चर)
२३)प्रीती मेहता (सेलिंग बिझनेस मॉडेल )

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

दखल

## राज्यस्तरीय संविधान कवी संमेलन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**



राज्यस्तरीय संविधान सन्मान परिषद 2025 चे नुकतेच आयोजन मुख्य संयोजक प्रा .भरत शिरसाठ यांनी संविधान नगरी हॉटेल कृष्णा मैदान एरंडोल जिल्हा जळगाव येथे भव्य दिव्य स्वरूपात आयोजित केले होते . यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक शुक्राचार्य गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच राज्यस्तरीय संविधान कवी संमेलनाचे एक सत्र संपन्न झाले. या संमेलनात महाराष्ट्रातील विविध भागातील निमंत्रित कवींची उपस्थिती लाभली, यामध्ये जीवन संघर्षकार फेम नवनाथ रणखांबे (सांगली ), भटू जगदेव (भिवंडी ) विजयकुमार भोईर ( भिवंडी ) , शाम बैसाने ( पवई) , श्रीकृष्ण टोबरे ( मुंबई) राजरत्न राजगुरू ( बदलापूर) , भरत शिरसाठ (एरंडोल), प्रवीण महाजन , महामुनी , भास्कर अमृत (धुळे ,) सागर निंबा बडगुजर, सुरेंद्र शिंदे ( ठाणे) वसंत हिरे ( मुलुंड) वर्षा शिरसाठ आदी . कवींनी कवितांचे सादरीकरण छान करून कविसंमेलनाची रंगत वाढवली. संविधानाची मूल्ये , महामानवाचे विचार आणि मानवतावादी विचारांची उधळ कवितेतून झाली . कवींना यावेळी सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

## म्हसावद येथे स्वच्छता प्रभात फेरीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**



जळगाव तालुक्यातील म्हसावद येथे गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता २०२४-२५ अंतर्गत स्वातंत्र्य सैनिक पं. ध.थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय म्हसावद शाळेच्या वतीने *स्वच्छ म्हसावद- सुंदर म्हसावद* या उपक्रमांतर्गत स्वच्छता रॅलीचे आयोजन केले. स्वच्छता उपक्रमांतर्गत विद्यालयाचे मुख्याध्यापक पी. डी. चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी व शिक्षकांनी स्वच्छता जनजागृती प्रभात फेरीचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी "स्वच्छ म्हसावद -सुंदर म्हसावद" असा संदेश देत लक्ष्मी माता मंदिर परिसर तसेच म्हसावद रेल्वे स्टेशन परिसरात स्वच्छता केली . स्वच्छता रॅलीत शाळेचे मुख्याध्यापक पी.डी. चौधरी सर ,एन. ए .पाटील सर, के. बी. पाटील मॅडम, एस. व्ही.. दुकळे सर, शिक्षकेतर कर्मचारी सोपान श्रावणे व शाळेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले.

## शिवसेना कसबा विधानसभेच्या वतीने निलेश गिरमे यांची महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले स्मारक व भिडे वाडा

### समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल यांचा सन्मान,

**दैनिक युवक आधार**
**पुणे वार्ताहर**




शिवसेना कसबा विधानसभा मतदार संघाच्या वतीने निलेश गिरमे यांची महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले स्मारक व भिडे वाडा समिती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा व युवा सेना महाराष्ट्र राज्य सचिव किरण साळी यांचा भव्य सत्कार गंजपेठ येथील महात्मा फुले वाडा समता भूमीमध्ये शिवसेना कसबा विधानसभेच्या वतीने शॉल पुष्पगुच्छ व महात्मा फुले यांची प्रतिमा भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला,

यावेळी समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे यांनी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले यावेळी महात्मा फुले वाडा पूर्ण पाहणी करून या भागातील विकास कामाच्या दृष्टीने नागरिकांशी संवाद साधला, याप्रसंगी शिवसेना पुणे शहर शिक्षक शिक्षकेतर संघाचे पुणे जिल्हाप्रमुख अनिल गडकरी सर, शिवसेना कसबा विधानसभा प्रमुख निलेश जगताप, विभाग संघटक अतुल कच्छावे, समन्वयक आकाश गायकवाड, प्रभाग प्रमुख संतोष कांबळे, उपविभाग प्रमुख सागर घोलप, आदि यावेळी उपस्थित होते

# शिवसेना जिल्हाप्रमुखपदी ए.जे. बोराडे यांची नियुक्ती ; कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी नामदेवराव मंडपे मंठा**

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी शिवसेनेच्या जालना जिल्हा प्रमुखपदी ए. जे. बोराडे यांची नियुक्ती केल्याने मंठा, परतूर तालुक्यासह जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष व्यक्त केला. ना. शिंदे यांनी माजी मंत्री तथा आ. अर्जुनराव खोतकर, आ. हिकमतराव उढाण, शिवसेना सचिव संजय मोरे, उपनेते आनंद जाधव, संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर यांच्या उपस्थितीत ए जे बोराडे यांना



जिल्हाप्रमुख पदाचे नियुक्तीपत्र दिले. श्री बोराडे यांनी आपल्या 30 ते 35 वर्षाच्या सामाजिक आणि राजकीय कार्यकाळात समाजाभिमुख व लोकोपयोगी अनेक कामे केली. त्यांनी मोर्चे आणि आंदोलनाच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकासह त्यांनी बहुतांश ग्रामपंचायतीवर कार्यकर्त्यांना संधी दिली. ए. जे. बोराडे यांनी यापूर्वी उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख म्हणून 16 वर्षे जबाबदारी सांभाळली. उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी जालना येथे झालेल्या प्रवेश सोहळ्यात ए जे बोराडे यांच्या कामाचे कौतुक केले होते. त्यांच्यावर जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी दिल्यानंतर आता कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष केला. त्यांच्या नियुक्तीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आज रविवार ता. 23 रोजी मंठा येथे आगमन होताच बाजार समितीच्या आवारात त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

**■ शिवसेनेचे संघटन मजबूत करणार - ए जे बोराडे...**

शिवसेनेचे मुख्य नेते, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी दिली असून या माध्यमातून जिल्ह्यात शिवसेनेचे संघटन मजबूत करणार असून सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी सांगितले.

## केएलई महाविद्यालयात कायदा महोत्सवाचा समारोप समारंभ, न्यायाधीशानी विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**नविन पनवेल वार्ताहर**

: केएलई सोसायटीच्या केएलई कॉलेज ऑफ लॉ कळंबोली येथे २२ मार्च रोजी राष्ट्रीय कायदा महोत्सवाचा समारोप समारंभासह संपन्न झाला. या स्पर्धेत भारतभरातून ५० संघांनी भाग घेतला. मूट कोर्ट स्पर्धा आणि क्लायंट काउंसेलिंग स्पर्धेच्या अंतिम फेऱ्या महाविद्यालयाच्या परिसरात पार पडल्या. मूट कोर्ट स्पर्धेच्या अंतिम फेरीचे परीक्षण पी. एस. दिनेश कुमार (अध्यक्ष, सिक्युरिटीज अपिलीयट ट्रायब्युनल; माजी मुख्य न्यायमूर्ती, कर्नाटक उच्च न्यायालय), मिलिंद जाधव (न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), आणि प्रा. (डॉ.) सोमू सी. एस. यांनी केले. समारोप समारंभ अरविंद कुमार (न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय), पी. एस. दिनेश कुमार, मिलिंद जाधव आणि प्रा. सोमू सी. एस. यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रभाकर कोरे, अध्यक्ष, केएलई सोसायटी, बेळगाव होते. डॉ. प्रभाकर कोरे यांनी केएलई सोसायटीच्या समृद्ध परंपरेबद्दल आणि शिक्षण व कायद्याच्या अध्ययनातील योगदानाविषयी भाष्य केले. न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांनी ३ आय आणि "५ पी" या संकल्पनांवर भर देत




यशस्वी वकिलांसाठी आवश्यक कार्यनैतिकता विषयी मार्गदर्शन केले. पी. एस. दिनेश कुमार यांनी कायदा व्यवसायात न्यायालयीन प्रक्रियेचे महत्त्व आणि सक्षम व समर्पित वकिलांची गरज अधोरेखित केली. न्यायमूर्ती अरविंद कुमार यांनी त्यांच्या वैयक्तिक प्रवासातील काही प्रेरणादायी अनुभव शेअर करत, परिश्रम, चिकाटी आणि समर्पण यामुळे कायदा व्यवसायात यशस्वी होता येते, हे स्पष्ट केले, तसेच प्रथम पिढीतील वकिलांसाठी प्रेरणादायी विचार मांडले. मूट कोर्ट स्पर्धेत केईएस श्री जयंतिलाल एच. पटेल लॉ कॉलेज यांनी विजेतेपद आणि 31 हजार रुपये आणि करंडक पटकावला. तर अलाईन्स युनिव्हर्सिटी, बेंगळुरू उपविजेता ठरला. त्यांना २१ हजार व करंडक प्रदान करण्यात आला. ख्रिस्त (डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी), लवासा यांना सर्वोत्कृष्ट विधी विद्यार्थी पुरस्कार मिळाला, तर महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बडोदा यांनी सर्वोत्कृष्ट स्मृतीपत्र पुरस्कार जिंकला. क्लायंट काउंसेलिंग स्पर्धेत दमोधरम संजीवैया नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी यांनी विजेतेपद पटकावले आणि ११ हजार व करंडक जिंकला, तर आयआयएलएम युनिव्हर्सिटी, गुरुग्राम उपविजेता ठरला. आयआयएलएम युनिव्हर्सिटी, गुरुग्राम येथील विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट सल्लागार पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाची सांगता प्रा. (डॉ.) दिनकर गीते, प्राचार्य, केएलई कॉलेज ऑफ लॉ यांनी आभार प्रदर्शन करून केली.

## डॉ.युवराज पोळ यांचा माहिती अधिकार समिती कडून सत्कार

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

सणसर ता.इंदापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नव्याने रुजू झालेले डॉ.युवराज पोळ यांचा सत्कार सणसर ग्रामस्थ यांच्या हस्ते रविवार आरोग्य केंद्रात जाऊन करण्यात आला.यावेळी ग्रामस्थ यांनी सत्कार केल्यामुळे डॉ.पोळ भारावून जाऊन सणसर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्व सामान्य रुग्णाची सेवा करण्यात सर्व स्टाफ बांधील असणार आहे असे मत मांडून ग्रामस्थ यांचे आभार मानले. यावेळी सत्कार प्रसंगी माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे तालुका अध्यक्ष विकास क्षत्रिय, माजी चेअरमन किरण गायकवाड,माजी ग्रामपंचायत सदस्य शरद कांबळे,जाचकवस्ती तंटामुक्तीचे अध्यक्ष सुनील निंबाळकर,इंदापूर शिवसेना युवा सेना पदाधिकारी राहुल जगताप, विक्रम भैय्या निंबाळकर, बाळासाहेब नलवडे,गणेश गवळी,धनंजय रायते,आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

सणसर प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी व सुविधाबदल असणाऱ्या अडचणी सांगण्यात आल्या असून आपण बायोमेट्रिक हजेरी बाबत लवकरच कारवाई करण्यात यावी म्हणून सूचना करण्यात आली.
**श्री.विकास क्षत्रिय**
**अध्यक्ष,माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण मिती इंदापूर तालुका**




## आपटी (रामपुर) येथील अवैध दारू विक्रेत्यांच्या विरोधात पोलिस ठाण्यात धडकल्या महिला

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगाव** : तालुक्यातील आपटी येथे अवैध दारू विक्री सुरू असल्याने अनेकजण व्यसनांच्या आहारी गेले. कुटुंबात कलह निर्माण झाला. अवैध दारू विक्रेत्यांना अटक करण्याच्या मागणीसाठी संतप्त महिलांनी राळेगाव रविवारी (दि. २३) पोलिस ठाण्यात धडकल्या होत्या. आपटी(रामपूर) ग्रामपंचायत आदर्श ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाते. मात्र, आपटी(रामपूर) गावात अवैध दारू व्यवसाय सुरू केला आहे. देशी, विदेशी व मोहफुलाची दारू आणून गावात विक्री करीत आहेत. यामुळे गावातील वातावरण कलुषित झाले. महिलांना याचा त्रास होत आहे. अवैध दारू विक्री पूर्णपणे बंद करण्याच्या मागणीला घेऊन आपटी येथील महिलांनी गावात बैठक घेतली. त्या नंतर गावातील महिलांनी पोलीस स्टेशन ला जाऊन ठाणेदार म्हैत्रे व राणे(स.पो.नि)यांना निवेदन




देण्यासाठी राळेगाव पोलीस स्टेशन ला धडकल्या. यावेळी, शशिकांत(बाळु)धुमाळ(समाजकार्य कर्त), उपसरपंच शशिकांत पिपंरे, ग्रा. प. सदस्य ओमप्रकाश मेश्राम , दिपक कोडापे, मारोती धुर्वे,मंदा मेश्राम, सविता येरकाडे,मालताबाई मेश्राम,अन्नपूर्णा नेहारे, शारदा परचाके, वंदना किन्नाके,गीता टोळे, सविता येरकाडे, कल्पना मरस्कोल्हे,सविता धुर्वे, ललिता कोडापे, चंद्रकला आत्राम, लक्ष्मी धुर्वे, सोनू मरसकोल्हे, माधुरी येरकाडे, शांताबाई उइके, सविता धुर्वे, इत्यादी महिला उपस्थित होत्या ..

## संतोष आसोले मोबाईल वर्ल्ड वाशिम चे संचालक यांना महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार 2025 प्रदान

**दैनिक युवक आधार**
**रिसोड वार्ताहर**
**रणजीत सिंह ठाकुर**

आई वडिलांचे स्वप्न पुंर्ण करण्यासाठी सतत धडपड करणारा स्वप्नवेढा आई चे निधन झाल्यावरच जगावं कसं हे सातत्याने मनी ध्यास धरून संतोष आसोले यांनी आपल्यातील जिद्द, चिकाटी मेहनती वृत्ती सोडली नाही वाशिम सारख्या ठिकाणी काही मालकांच्या हाताखाली काम करून स्वतःचे शिक्षण पूर्ण केले, शिक्षण घेत असताना अर्धवट शिक्षण करावे लागले, मात्र काम करत असताना गरीबीची लाज न बाळगता आज त्याचेच फलित म्हणून एक जिल्हातील नामांकित उद्योजकापर्यंत संतोष आसोले यांनी धाव घेतली आहे, दहा वर्षांपासून मोबाईल वर्ल्ड शॉप चे वाशिम सारख्या ठिकाणी सेलर्स उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले आसोले यांना यंदाचा मान्यता प्राप्त शीर्षक महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार 2025 सिनेमा अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते देण्यात आला आहे, अत्यंत कमी कालावधी मध्ये आसोले यांनी आपले नावलौकिक केले आहे, त्यांच्या




कामाचा आवाका पाहता त्यांना अनेक मान्यवराकडून स्मृतीचिन्हे, पुरस्कार मिळाले आहेत, नाशिक येथील रिसील. इन च्या वतीने संतोष आसोले यांना महाराष्ट्र उद्योजकता पुरस्काराने गौरवन्यात आल्याने त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे,सोमा वाईन व्हिलेज नाशिक येथे पुरस्कार सोहळा संपन्न झाला, यावेळी समाधान महाजन GST डेप्युटी कमिशनर महाराष्ट्र राज्य, इको बँक चे झोनल म्यॅनेजर आमलेश त्रिपाठी, रिसील. इन चे CEO फाउंडर सुधीर पठाडे यांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

# पनवेलसह राज्यातील गृहनिर्माण संस्था इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाची चळवळ यशस्वी होणार- प्रविण दरेकर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इमारतीच्या स्वयंपुनर्विकासाचे पालकत्व स्वीकारले आहे त्यामुळे पनवेलसह राज्यातील स्वयंपुनर्विकासाची चळवळ यशस्वी होणार आहे, आणि या चळवळीला वेग देण्यासाठी शासनाची सर्व मदत होणार आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेतील भाजपचे गटनेते व मुंबै बँकेचे अध्यक्ष प्रविण दरेकर यांनी आज (दि. २३) येथे व्यक्त केले. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने व पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादित यांच्या विद्यमाने आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या सहकार्याने "सहकारी गृहनिर्माण संस्थांचा इमारतींचा स्वयं पुनर्विकास" या विषयावर शहरातील विरुपाक्ष हॉल येथे मार्गदर्शनपर शिबिर पार पडले. या शिबिराला मार्गदर्शन करताना प्रवीण दरेकर बोलत होते. यावेळी मार्गदर्शन करताना प्रवीण दरेकर यांनी भाषणाच्या सुरुवातीला, आज हा एकप्रकारे मेळावा होत असल्याचे सांगत स्वयंपुनर्विकास या मोठ्या चळवळीचे पनवेलकर साक्षीदार होणार असून सर्वसामान्य माणसाच्या फायद्यासाठी आमदार प्रशांत प्रशांत ठाकूर यांनी महत्वाचा विषय हाती घेतला असल्याचे नमूद करत त्यांचे आणि सहकाऱ्यांचे कौतुक केले. तसेच हे अभियान पनवेलमध्ये ताकदीने होणार असल्याचे जाहीर केले. विकासक त्याच्या फायद्यासाठी डेव्हलोपमेंट करतो तर स्वयंपुनर्विकासमध्ये संबंधित संस्था आणि सदनिकाधारकांचा लाभ होतो. स्वतःच्या इच्छेनुसार विकास करता येतो. स्वयंपुनर्विकास यापूर्वी होते पण आता ते चळवळ म्हणून उभी राहिले आहे आणि याला ताकद देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले असून या संदर्भात धाडसी निर्णय त्यांनी घेतले आहेत. मुंबईतील गृहनिर्माण संस्थांची परिषद घेतली त्यावेळी २२ हजार लोकांनी नोंदणी केली. या संदर्भातून देवेंद्रजींकडे २० विषय मांडले आणि त्यातील तब्बल १८ विषयावर शासन निर्णय झाले. चारकोप श्वेतांबरा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्वयंपुनर्विकसित प्रकल्पाच्या सदनिका धारकांना त्यांच्या घरांच्या चाव्या देवेंद्रजींच्या हस्ते देण्यात आल्या त्यावेळी त्या लोकांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्या ठिकाणी ३६० स्केअर फूटच्या घराला १४०० स्केअर फुटाचे घर मिळाले आणि त्याच धर्तीवर पनवेलला मोठा फायदा होणार असून राज्यातील इतर भागातही स्वयंपुनर्विकसित प्रकल्प राबविण्यात येईल आणि यासाठी सर्वोत्तपरी मदत केली जाईल, असे आश्वासन प्रवीण दरेकर यांनी दिले. घर आयुष्याची मोठी पुंजी आहे.ते प्रत्येकाचे स्वप्न आहे आणि ते साकार करण्यासाठी






आपण सर्व प्रयत्नशील आहोत त्यामुळे स्वयंपुनर्विकासाठी प्रत्येक सभासदाने इच्छाशक्ती ठेवली पाहिजे पैशाची कमतरता भासू देणार नाही असेही अधोरेखित केले. पनवेलमधील पहिल्या पाच इमारती सुचवा त्यांचे स्वयंपुनर्विकास करण्यासाठी मुंबै बँक पैसे देईल, तसेच पनवेलमधील इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाठी शासनाची सर्व मदत दिली असेही त्यांनी आश्वासित केले. त्याचबरोबर पुढील पिढीच्या भविष्यासाठी आत्मनिर्भर आणि स्वाभिमानाने स्वयंपुनर्विकासाठी सहभागी व्हा, असे आवाहनही त्यांनी केले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना सांगितले कि, प्रवीणभाऊ दरेकर यांनी मुंबईमध्ये गृहनिर्माण संस्थेचा स्वयंपुनर्विकास जादूच्या कांडीप्रमाणे केले आहे. आता मुंबईत विविध प्रकल्पासाठी त्यांच्याकडे रांग लागली आहे. मुंबईमध्ये आमदार प्रवीणभाऊंच्या संकल्पनेतून चारकोप श्वेतांबरा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्वयंपुनर्विकसित प्रकल्पाचे उद्घाटन व गृह चाव्या प्रदान समारंभ संपन्न झाला. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक सहाय्याने साकारलेल्या या प्रकल्पाचे उद्घाटन कार्यतत्पर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले आणि या कार्यक्रमाला मलाही निमंत्रित केले होते आम्ही त्या ठिकाणी दर्जेदारपणे सोसायट्यांचा पुनर्विकास झाल्याचे पहिले आणि त्या अनुषंगाने हजारो प्रस्ताव राज्य सरकारला प्राप्त झाले आहेत. त्यामुळे पनवेलमध्येही स्वयंपुनर्विकास उपक्रम राबविण्याचा संकल्प केला. आणि यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस आणि प्रवीणभाऊंची ताकद आपल्याला मिळणार आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. घर आणि परिवार प्रगतीचा मूळ असतो त्यामुळे चार भिंती आणि डोक्यावर छप्पर असेल तर सुरक्षितता असते. लोकांचे प्रश्न सोडविण्याचे काम आम्हा लोकप्रतिनिधीचे असते असे सांगून पनवेलमधील मोडकळीस आलेल्या इमारतींचे स्वयंपुनर्विकास करण्यासाठी आजच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुरुवात झाली आहे. त्यानुसार देवेंद्रजी आणि प्रवीणभाऊंच्या मार्गदर्शनाखाली हे स्वयंपुनर्विकासाचे काम मार्गी लावून सर्वसामान्यांचे स्वप्न साकार केले जाईल आणि त्यासाठी गृहनिर्माण संस्था सदनिका धारकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सहकाऱ्यांची टीम तयार केली जाणार असल्याचे सांगून स्वयंपुनर्विकास सर्वसामान्य सदनिकाधारकासाठी चळवळ म्हणून काम करेल, असा विश्वासही आमदार प्रशांत ठाकूर यांनी गृहनिर्माण संस्था सदनिकाधारकांना दिला. यावेळी बोलताना आमदार विक्रांत पाटील यांनी म्हंटले कि, घर म्हणजे प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आणि आयुष्याचा संघर्ष हक्काच्या घरासाठी असतो. आणि त्यातच पुढील पिढीचा विचार करून तरुणपणात स्वतःचे पहिले घर मिळवणे हे मोठे स्वप्न असते. पुनर्विकास करताना जो प्रकल्प साकारला जाईल त्यामध्ये पैसे वाया जाऊ नये हा सर्वांची अपेक्षा असते विकासक चांगला असेल कि नसेल असा प्रश्न सर्वांना पडतो. विकासकाकांडून फसवणुकीचे प्रकार होत असतात. त्यामुळे विकासकाचा फायदा होण्यापेक्षा सदनिका धारकांचा आणि संस्थेचा विकास झाला पाहिजे त्यामुळे स्वयंपुनर्विकास हा उपक्रम महत्वाचा आहे. असेही त्यांनी अधोरेखित केले. यावेळी माजी निवृत्त सहनिबंधक राजेंद्र पवार यांनीही स्वयंपुनर्विकास संदर्भात मार्गदर्शन केले.तसेच यावेळी संस्था, सदनिका धारकांनी उपस्थित केलेल्या प्रश्न व सूचनांना मार्गदर्शन केले. तर प्रास्ताविक पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादितचे अध्यक्ष कुंडलिक काटकर, आभार प्रदर्शन सल्लागार व माजी नगरसेवक नितीन पाटील यांनी केले.

**यांनी केले.**

या कार्यक्रमाला कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादितचे सचिव भरत मोरे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी नगरसेविका दर्शना भोईर, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष राजेश्री वावेकर, अमित ओझे, अड. चेतन जाधव, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, संजय भगत, रुपेश नागवेकर, महेश सरदेसाई, अभिषेक पटवर्धन यांच्यासह गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वयंपुनर्विकासाचे फायदे!

संबंधित इमारतीचा पुनर्विकास स्वतः सदनिका धारक म्हणजेच सोसायटी करते. या सभासदांना दुप्पट किंवा त्याहून अधिक मोठया क्षेत्रफळाचे घर मिळू शकतील.बिल्डरला मिळणार लाभ सदनिकाधारकांना होईल.वेगवेगळया पायाभूत सुविधांचा विकास करता येईल. त्य़ाचबरोबर रहिवाशी आत्मनिर्भर होतील. सर्वसामान्य सदनिकाधारकांची फसवणुक होणार नाही.हा प्रकल्प सोसायटी करत असल्याने तो वेळेत पुर्ण होऊ शकतो. मुंबईच्या धर्तीवर अशा प्रकारचे प्रकल्प राबवल्यामुळे पनवेल मधील हजारो कुटुंबीयांचे प्रशस्त घरांचे स्वप्न साकारण्यास एक प्रकारे मदत होणार आहे.

# सागरी सुरक्षेच्या जनजागृतीसाठी मोटार सायकल रॅलीचे आयोजन

**दैनिक युवक आधार/**
**उरण शहर प्रतिनिधी/सायली साळुंखे**

उरण तालुका हे बेट असून त्याच्या विस्तीर्ण समुद्र किनार्यावर अनेक राष्ट्रीय प्रकल्प आहेत मा.पोलीस सहआयुक्त नवी मुंबई यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय सागरी सुरक्षा समन्वय समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये "सागरी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून"जनजागृती" व्हावी यासाठी मोटार सायकल रॅली/मॅरेथॉन स्पर्धा पोलीस ठाणे स्तरावर आयोजित करणे बाबत आदेशित करण्यात आले होते. त्याअनुषंगाने दिनांक 20/03/2025 रोजी सायंकाळी 18:15 ते 19:05 वा.चे दरम्यान उरण-न्हावाशेवा- मोरा सागरी पोलीस ठाणे हद्दीतील सागर रक्षक दल सदस्य, मच्छिमार बांधव व पोलीस अंमलदार यांची संयुक्तपणे उरण पोलीस ठाणे हद्दीत मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर मोटार सायकल रॅली ही पेन्शस् पार्क, उरण येथून सुरू होवून म्हातवली, नागाव, पिरवाडी मार्गाने एस.टी.स्टॅन्ड चारफाटा मार्गे करंजा गावातून करंजा जेटी, उरण या दरम्यान काढण्यात आली होती.

सदर मोटार सायकल रॅली दरम्यान उपस्थित सागर रक्षक दल सदस्य, मच्छिमार बांधव व पोलीस अंमलदार यांनी उरण शहरात, पिरवाडी, करंजा जेटी याठिकाणी सागरी सुरक्षेबाबत जनजागृती तसेच कोस्टल फ्री हेल्पलाईन क्रं.1093 चे टि शर्ट परिधान करून व पॅम्पलेट वाटप करून प्रचार/प्रसार करण्यात आला.

सदर मोटार सायकल रॅली मध्ये उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ जितेंद्र मिसाळ,तसेच उरण, न्हावाशेवा व मोरा सागरी पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार यांचे सह 45 सागर रक्षक दलाचे सदस्य व मच्छिमार बांधव यांनी सहभाग घेतला होता. सदरची मोटार सायकल रॅली शांततेत व उत्साहात पार पडली.



# वीर वाजेकर महाविद्यालयात होळीव वनदिनाचे औचित्य साधून
## ‘ग्लोबल वॉर्मिंग’ विषयावर पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**कॉलेज कट्टा/आरती सुरवसे**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय फुंडे-उरण येथे BMS आणि BAF विभागाच्या वतीने होळी आणि जागतिक वनदिनाचे औचित्य साधून ‘ग्लोबल वॉर्मिंग’ या महत्त्वपूर्ण विषयावर पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.होते या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना जागतिक तापमानवाढीचे परिणाम, त्याची कारणे आणि त्यावरील उपाय याबद्दल जागरूक करणे हा होता.

विद्यार्थ्यांनी तापमानवाढीमुळे होणारे पर्यावरणीय संकट, वाढते वायू प्रदूषण, जंगलतोड, बर्फाच्या शिखरांचे वितळणे, हवामान बदल आणि जैवविविधतेवरील परिणाम यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर प्रभावी पोस्टर तयार केली. यासोबतच ग्रीन एनर्जीचा वापर, प्लास्टिकचा कमी उपयोग, झाडे लावा – झाडे जगवा यासारख्या उपाययोजनांवर देखील विद्यार्थ्यांनी आपल्या संकल्पकतेतून विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रभारी प्राचार्य डॉ. अमोद ठक्कर यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे निरीक्षण करून त्यांचे कौतुक करताना ते म्हणाले – "होळी हा रंगांचा आणि पर्यावरण संवर्धनाचा उत्सव आहे. परंतु वाढत्या तापमानामुळे पर्यावरण धोक्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी केलेले सादरीकरण जागरूकतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे."ज्या स्पर्धकांनी यात सहभाग दर्शवून अतिशय चंगल्या संकल्पना सादरकेल्या . या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांनी फक्त शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर सामाजिक जबाबदारीची जाणीवही आत्मसात केलीअसल्याने. त्या सर्व स्पर्धकांचे मी कौतुक करतो असे ते म्हणाले.



भविष्यात अशाच प्रकारचे पर्यावरणपूरक उपक्रम हाती घेण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी यावेळी केला, ज्यामुळे हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बीएमएस विभागप्रमुख भूषण ठाकूर आणि प्राध्यापिका प्रियांका ठाकूर, दीक्षिता म्हात्रे, रेणू सरोज आणि आरती पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.

# खोपोलीत खंडणी वसुलीचा धक्कादायक प्रकार ! गुन्हा नोदविण्यास विलंब?
## सदरचे प्रकरण बोगस असल्याचा खोपोली पोलीस निरीक्षकांचा दावा !

**दैनिक युवक आधार**
**खोपोली/ विशेष प्रतिनिधी**

खालापुर तालुक्यातील न्यु पटेलनगरमध्ये आदिवासी जमिनीच्या वादातून पैसे उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रहिवासी तक्रारदार वसीउल्लाह मोहम्मद उमर मन्सुरी यांनी सदर पोलिस ठाण्यात दिलेल्या जबाबानुसार, अफजल पीरमोहम्मद शेख या व्यक्तीने त्यांच्यासह अनेक रहिवाशांना धमकावत पैसे उकळण्याचा प्रकार केला आहे. या व्यक्तीच्या विरोधात 5 ते 6 तक्रारी देण्यात आल्या असल्या तरी त्यांतील एकाच तक्रारीची नोंद घेत बाकी तक्रारदारांची फिर्याद घेण्यास पोलीस विलंब करीत आहेत असे तक्रारदरांचे म्हणणे आहे. आरोपी अफजल पीरमोहम्मद शेख याच्यावर खोपोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला असला तरी सदर प्रकरण हे खोपोली पोलिसांनी फारसे गांभीर्याने घेतलेले दिसत नाही. याबाबत खोपोली पोलीस निरीक्षक शितल राऊत यांना सदर गुन्ह्याबाबत विचारणा केली असता सदर प्रकरण हे बोगस असल्याचा दावा त्यांनी केला आहे. याबरोबरच तपास पूर्ण करण्यासाठी आमच्याकडे 60 दिवसांचा अवधी असल्यामुळे 60 दिवसानंतर अधिकृत माहिती दिली जाईल असे बेजबाबदार पणाचे उत्तर पोलीस निरीक्षक शितल राऊत यांनी दिले असल्याने आरोपीबाबतची तक्रार घेण्या बाबत पोलीस जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत असल्याचे मत व्यक्त करीत तक्रार दाराकडुन संताप व्यक्त होताना दिसत आहे. शिवीगाळ, दमदाटी आणि जीवे ठार मारण्याची धमकी तसेच "तुला येथे राहायचं असेल तर पैसे दे," असा

> अफझल शेख हा पैशासाठी दमदाटी, शिवीगाळ करून धमकी देत असतो.खोपोली पोलिसात आम्ही गेलो असता पोलिसांनी आमची बाजूच ऐकून घेतली नाही. शेवटी वरिष्ठांकडे तक्रार केल्यानंतर4 दिवसानंतर खोपोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला, मात्र आरोपीला चौकशीसाठी अटक कारण्याबाबत तपास होताना दिसत नाही. अनेक महिलांनी पोलीसात तक्रारी अर्ज सादर केले आहेत, मात्र पोलीस या भगिनींना जबाबाच्या नावाखाली यामुळे दिवसभर पोलीस ठाण्यात बसवून ठेवत आहेत, पण त्यांच्या तक्रारीची दखल घेताना दिसत नाहीत.
> **उषा सोमनाथ नेहरकर - मुंडे तक्रारदार**

दबाव टाकत गुन्हेगारी स्वरूपाचा आर्थिक फसवणूकीचा गैर व्यवहार केला असल्याची नोंद . भारतीय न्याय संहिता (बीएनएस) 2023 अंतर्गत 308(2), 352, 351(2) नुसार अफजल पीरमोहम्मद शेख या इसमावर गुन्हा खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलाअसला तरी तपासाच्या दृष्टीने पोलिसांकडून योग्य ती कारवाई होत नसल्याचा आरोप तक्रारदार रहिवाशांकडून केला जात आहे. या प्रकरणातील आरोपी अफझल शेख यांच्या विरोधात खंडणीचे गुन्हे दाखल होण्यासारखे तक्रारी अर्ज खुशबू विश्वकर्मा, फरीदा खातून, साजदा खान, फर्जना शेख ,शकीला अकबर अली यांनी दिनांक २८ फेब्रुवारी रोजी खोपोली पोलिसांना देऊन देखील त्यांच्या अर्जावर अद्यापही कारवाई करण्यात आली नसल्यामुळे पोलिसांची नेमकी भूमिका काय आहे? याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या, फसवणूक करणाऱ्या भूमाफीयांच्या टोळीचा भांडाफोड होणार का? पोलिसांच्या तपासातून आणखी कोणते धक्कादायक गौप्यस्फोट होतीलका ? आरोपी जेरबंद होतील का? अशा समाजकंटकांपासून खोपोली शहर सुरक्षित ठेवण्यासाठी पोलीस व पालिका प्रशासन कोणती कठोर पावले उचलणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# आयुष्य....

आयुष्य म्हणजे एक अखंड प्रवास. कधी चढ, कधी उतार; कधी सोपे रस्ते, कधी काटेरी वळणे. पण काही वेळा असा एखादा वळण येतो, जिथे थांबावं लागतं. कुठे जायचं, कोणाला सांगायचं, काय करायचं–काहीच कळत नाही.

माणूस असहाय्य होतो. तो स्वतःलाच प्रश्न विचारू लागतो–हे का घडतंय? मी कुठे चुकलो? याचा शेवट काय? पण याच क्षणी सर्वात महत्त्वाची गोष्ट असते–"टिकून राहणं." संयम ठेवणं. आणि योग्य वेळ आल्यावर योग्य निर्णय घेणं.

**जेव्हा संकट समोर उभं राहतं**

जेव्हा आयुष्य अनपेक्षित कलाटणी घेतं, तेव्हा माणसाला दोनच गोष्टी सुचतात–लढावं किंवा पळावं. पण काही परिस्थितीत पळून जाणं हा उपाय नसतो, आणि लढायचं तरी कोणाशी? आयुष्याशी? परिस्थितीशी? नशिबाशी? की स्वतःशी?

कधी नाती तुटतात आणि प्रश्न पडतो, "मी एवढं दिलं तरी असं का झालं?"

कधी अपयश येतं आणि वाटतं, "मी इतका प्रयत्न केला, तरी मला यश का मिळालं नाही?"

कधी माणसं सोडून जातात आणि आपण विचार करतो, "मी इतका खराब आहे का?"

कधी आपण कुणासाठी समर्पित होतो, पण समोरचा त्याची कदर करत नाही.

या सगळ्या प्रसंगात एकच भावना असते–अत्यंत हतबलता!

"पान पलटण्यापेक्षा पुस्तकच बदलावं!"

बऱ्याच लोकांना असं वाटतं की, परिस्थिती सुधारण्यासाठी थोडा बदल करायचा, जुनी गोष्ट विसरायची आणि नव्याने सुरुवात करायची. पण कधी कधी, फक्त पानं पलटली तरी काहीच बदलत नाही.

जर तुम्ही वारंवार त्याच नात्यात तुटत असाल, तर कदाचित त्या नात्याचा विचारच सोडणं योग्य.

जर तुम्ही सतत संघर्ष करताय, पण प्रगती नाही, तर कदाचित मार्गच बदलणं योग्य.

जर तुम्ही वारंवार अपमान सहन करताय, तर तिथून बाहेर पडणं गरजेचं.

कारण काही पुस्तकं वाचायची नसतात, तर सोडून द्यायची असतात.

**संयम कसा ठेवायचा?**

संकटं आली की माणूस दोन टोकांवर जातो–कधी तो निराश होतो, कधी तो आक्रमक होतो. पण कोणत्याही परिस्थितीत संयम महत्वाचा.

१) स्वतःला वेळ द्या

कोणताही मोठा निर्णय ताबडतोब घेऊ नका. दुःख, राग, निराशा या भावनांच्या आहारी गेलात, तर चुकीचा निर्णय होईल. त्याऐवजी स्वतःला शांत करा.

**२) बाहेरचं ऐकायचं, पण निर्णय स्वतः घ्यायचा**

लोक तुमच्या परिस्थितीवर वेगवेगळे सल्ले देतील. पण अखेर निर्णय तुमच्या जगण्याचा आहे, त्याला तुम्हीच जबाबदार असाल.

**३) बदल स्वीकारा**

काही गोष्टी बदलता येत नाहीत. पण आपण त्या स्वीकारून पुढे जाऊ शकतो. तुटलेली नाती, न मिळालेलं यश, झालेली चूक–यात अडकून राहण्यापेक्षा नवीन सुरुवात करणं केव्हाही चांगलं.

**४) स्वतःला कमी लेखू नका**

"मी अपयशी आहे," "मी चुकलो," "माझं काहीच होणार नाही"–अशा नकारात्मक विचारांनी आत्मसन्मान ढासळतो. त्याऐवजी स्वतःला समजून घ्या, चुका सुधारायचा प्रयत्न करा आणि पुढे चला.

आपल्या समाजात लोक संकटात सापडलेल्या माणसाला मदत करायच्या ऐवजी त्याचं नुसतं विश्लेषण करतात.

जर एखाद्याचं नातं तुटलं, तर त्याला आधार देण्याऐवजी विचारलं जातं "काय चुकलं असेल?"

जर कुणाला अपयश आलं, तर त्याला सांभाळण्याऐवजी म्हणतात–"कष्ट कमी पडले असतील!"



जर कुणी नैराश्यात असेल, तर त्याला समजून घेण्याऐवजी बोललं जातं "इतका कमकुवत का?"

**- लेखक-**
**गोकुळभाऊ सानप, पत्रकार रायमोहा, ता.शिरूर(का.)**

# रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या वतीने देण्यात आले पनवेल शहर पोलीस ठाण्याला वॉटर कुलर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल तालुका प्रेस क्लबच्या माध्यमातून पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे वॉटर कुलर रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल यांच्या वतीने देण्यात आला आहे. पनवेल शहर पोलीस ठाणे येथे येणाऱ्या तक्रारदार व अर्जदार अभ्यंगासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था म्हणून वॉटर कुलर कोणत्या सामाजिक संस्थेकडून मिळेल का अशी विनंती पोलीस ठाण्याकडुन पनवेल तालुका प्रेस क्लबचे सदस्य व रायगड जिल्हा प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्याकडे केली होती. याचा त्वरित पाठपुरावा करून जवळपास 50 हजार रुपये किमतीचा वॉटर कुलर रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल यांच्या मार्फत मंजूर करून घेऊन तो पनवेल शहर पोलीस ठाणाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर बसविण्यात आला आहे. सदर वॉटर कुलरचे उद्घाटन रोटरी 3131 चे जिल्हा गव्हर्नर शीतल शाह, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, पो.नि.शाकीर पटेल, जिल्हा प्रथम महिला रागिणी शाह, सहाय्यक गव्हर्नर डॉ. किरण कल्याणकर, पीडीजी डॉ. गिरीश गुणे, अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दीपक गडगे, डॉ.आवटे, रोटेरियन आणि अनस, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल सदस्य तसेच पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे, रायगड प्रेस क्लब जिल्हा सल्लागार संजय कदम, सचिव दत्तात्रेय कुलकर्णी, खजिनदार राकेश पितळे, सल्लागार विजय पवार, प्रतिक वेदपाठक आदींसह पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सेवा, परमो, धर्माचे पालन करणारा लोक प्रतिनिधी अपघात ग्रास्ताच्या मदतीला धावले आमदार राजु तोडसाम

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

घाटंजी येथील विसावा पॉइंटजवळ, आर.एन. हॉस्पिटलच्या समोर, ट्रॅक्टर आणि कारचा भीषण अपघात झाला. यात काही नागरिक गंभीर जखमी झाले. यवतमाळ येथे महत्त्वाच्या बैठकीला जात असताना, मा. आमदार राजूभाऊ तोडसाम यांनी सदर दुर्घटना पाहताच बैठकीला उशीर झाला तरी चालेल, पण माणसाचा जीव वाचवणे अधिक महत्त्वाचे! या भावनेतून तात्काळ गाडी थांबवली आणि स्वतः जखमींना मदतीसाठी पुढे सरसावले.

**राष्ट्र प्रथम, माणूसकी सर्वोच्च!**

जनतेच्या सेवेसाठी तत्पर असलेले, लोककल्याणाचा वसा जपणारे संवेदनशील आमदार राजूभाऊ तोडसाम यांचा आम्हाला अभिमान आहे!



# वरीष्ठ व निवड श्रेणीचा लाभ हा शिक्षकांचा हक्क; शिक्षणाधिकारी यांनी तातडीने न्याय द्यावा - जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी

**दैनिक युवक आधार**
**बीड प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शिक्षकांना एकाच पदावर निश्चित केलेल्या अटी शर्ती व सलग बारा वर्षे सेवेनंतर चटोपाध्याय आयोगाने शिफारस केलेली वरीष्ठ वेतन श्रेणी व सलग चोवीस वर्षे सेवा केल्यानंतर निवड श्रेणी बहाल केली जात असते. जिल्हा परिषद बीड मधील शिक्षण विभागाने मागील पंचवीस ते तीस महिन्या पासून एकही शिक्षकास निवड श्रेणीचा तर पंधरा ते वीस महिन्या पासून वरीष्ठ श्रेणीचा लाभ दिलेला नाही. वास्तविक पाहता, वरीष्ठ व निवड श्रेणी साठी पात्र असणाऱ्या शिक्षक बांधवांना सदरील श्रेणीचा लाभ तातडीने मिळणे हा त्यांचा हक्क आहे.

मात्र शिक्षण विभाग वरीष्ठ व निवड श्रेणीच्या प्रस्तावित केलेल्या पाच संचिका निकाली काढण्यात अद्याप यशस्वी झालेला नाही. तेव्हा माननीय शिक्षणाधिकारी साहेबांनी खातेप्रमुख या नात्याने तातडीने सदरील संचिका निकाली काढव्यात, अशी मागणी प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड चे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे केली आहे, अशी माहिती जिल्हा सरचिटणीस अविनाश काळे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वरीष्ठ श्रेणी व निवड श्रेणीचे लाभ हे अनुक्रमे बारा व चोवीस वर्षे पुर्ण झाले की पुढील सहा महिन्यांत संबंधित पात्र लाभार्थ्यांना मिळाले पाहिजेत,असे मत जिल्हा कार्याध्यक्ष ओमप्रकाश आणेराव व उपाध्यक्षा वैशालीताई आकुसकर,शीला चक्रे, वर्षाराणी महाजन व सय्यद मुमताज यांनी मांडले आहे.

वरीष्ठ व निवड श्रेणी साठी दाखल प्रस्तावामधून प्रहारने केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे वरीष्ठ श्रेणीच्या दोन व निवड श्रेणीच्या तीन संचिका पदोन्नती समितीच्या मान्यतेने निकाली निघण्याच्या अंतिम टप्प्यात आलेल्या असतानाही, मागील तीन महिन्यांपासून खातेप्रमुखांनी त्या निकाली का काढलेल्या नाहीत, हा प्रश्न जिल्हा भरातील शिक्षक बांधवांना पडलेला आहे, अशी प्रतिक्रिया जिल्हा संपर्कप्रमुख शहादेव मराठे, राजाराम लकडे,



गणेश खेडकर,पी आर खेडकर व अशोक सप्रे यांनी दिली आहे. विशेष म्हणजे राज्य शासनाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद बीडचे कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमान आदित्यजी जीवने साहेब यांनी दिलेल्या "शंभर दिवशीय" महत्वकांक्षी असा प्राधान्याने करावयाचे कामांबाबत कार्यक्रम सर्व विभागांना दिला आहे . यामध्ये शिक्षण विभागाने निकाली काढावयाच्या विषय व प्रकरणांमध्ये देखील वरीष्ठ व निवड श्रेणी संचिका जानेवारी महिना अखेरीस निकाली काढण्याची बाब समाविष्ट करून वरीष्ठांना सादर केलेली आहे,अशी माहिती उर्दू विभागाचे प्रमुख मिर्झा हसनात,जिल्हा प्रवक्ते संजय पाटील, वसंत तरकसबंद, सुरेश वाघमारे, संजय कुलकर्णी संजय लोखंडे यांनी दिली आहे. मात्र अद्याप पर्यंत या संचिका शिक्षणाधिकारी प्रा. निकाली काढू शकलेले नाहीत. प्रहारने यासाठी वारंवार पाठपुरावा केलेला आहे. या श्रेणींचा लाभ कारण नसताना विलंब होत असल्याने पात्र लाभार्थी शिक्षक बांधवांमध्ये प्रचंड असंतोष आहे. म्हणूनच पुढील आठ दिवसांत सदरील प्रस्तावित संचिका शिक्षण विभागाने निकाली न काढल्यास व उर्वरित पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत उचित कार्यवाही न केल्यास प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड , सर्व प्रहार पदाधिकारी पात्र लाभार्थी शिक्षक बांधवांसह जिल्हा परिषद, बीड कार्यालया समोर "घंटानाद आंदोलन" करण्याची तयारी करत आहे,अशी माहिती तालुका अध्यक्ष सय्यद जिलानी, दत्ता गाडेकर, बाळासाहेब गावडे यांनी दिली आहे. तशी पुर्व सुचना व इशारा प्रहार शिक्षक संघटनेने शिक्षण विभागास सादर केलेल्या निवेदनात दिला आहे. याप्रसंगी प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड चे पदाधिकारी जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी,जिल्हा सचिव-अविनाश काळे कोषाध्यक्ष-उत्तरेश्वर बजगुडे, उर्दू विभाग प्रमुख- मिर्झा हसनात, जिल्हा कार्याध्यक्ष -ओमप्रकाश आणेराव, प्रहार पेन्शनर सेल प्रमुख-सुरेश प्रधान व राजेसाहेब चव्हाण, प्रहार आरोग्य विभाग प्रमुख गोविंद गोचडे,प्रहार एज्युकेशन सेल प्रमुख अरविंद चौधरी व अण्णासाहेब खंडागळे, प्रहार जुनी पेन्शन सेल प्रमुख -सुदर्शन काळे ,प्रविणा कांबळे ,प्रहार तक्रार निवारण सेल चे प्रमुख-पी. आर. खेडकर व पुरषोत्तम खेत्रे ,कार्याध्यक्ष -नवनाथ धोंगडे ,सय्यद मुमताज , वैशालीताई आकुसकर, सहसचिव अंबादास बागलाने, जिल्हा प्रवक्ता- पद्माकर आंधळे ,मन्मथ अरबने, किरण सारुक ,निर्मलाताई वाघमारे जिल्हा उपाध्यक्ष-कादरी कदीर (शिक्षकेतर विभाग),पी. आर. खेडकर,महादेव गीते, शामराव मिरगे ,दिपक देशमुख,प्रल्हाद फड, शेख ऐनोद्दीन ,वर्षाराणी महाजन समन्वयक- संजय पाटील, शामराव आघाव, अण्णासाहेब खंडागळे, शिवाजी झेंडेकर संघटक- श्रीमती प्रविणाताई कांबळे, बापूसाहेब शिंदे ,अशोक सप्रे, सुरेश वाघमारे, संजय लोखंडे संपर्कप्रमुख- संध्याताई टेकाळे, वसंत तरकसबंद, राजाराम लकडे, राजेंद्र बेले, पांडुरंग जोगदंड , शहादेव मराठे , विठ्ठल सानप,सहसचिव -अंबादास बागलाने ,महेश भट, संजय कुलकर्णी बीड तालुकाध्यक्ष -सय्यद जिलानी, वडवणी तालुकाध्यक्ष -संगीता तिडके,शिरूर कासार तालुकाध्यक्ष- दत्तात्रय गाडेकर , गेवराई तालुकाध्यक्ष -बाळासाहेब गावडे, माजलगाव तालुकाध्यक्ष -लक्ष्मण सरवदे, पाटोदा तालुकाध्यक्ष -मुकींद गाडे, आष्टी तालुकाध्यक्ष भाऊसाहेब काळे, धारूर तालुकाध्यक्ष- हनुमंत मंत्रे, परळी तालुकाध्यक्ष - कमलाकर कामाळे, अंबेजोगाई तालुकाध्यक्ष-बाळासाहेब पिसुरे, केज तालुकाध्यक्ष - प्रभूकांत सोन्ने इत्यादी उपस्थित होते.

# आपले विचार नेहमी चांगले असावे

रमजान महिन्यातील शब ए कद्र च्या २१ व २३ या दोन रात्री निघून गेल्या आहेत.२५,२७ व २९ या तीन रात्री अजून शिल्लक आहेत.या तिन्ही रात्री मध्ये शब ए कद्र चा शोध घेण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करणे आवश्यक आहे.जर ही रात्र आपल्याला प्राप्त झाली तर हजार महिन्यांच्या इबादतीचे पुण्य प्राप्त होणार आहे. त्यासाठी रमजान पर्वातील या शेवटच्या खंडातील ज्या काही रात्री आपल्याला मिळतील,त्यात जास्तीत जास्त प्रार्थना करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. कुरआन शरीफच्या माध्यमातून अल्लाहने आपल्या पैगंबरांमार्फत एक अनमोल मार्गदर्शक असा ग्रंथ आपल्याला दिला आहे. त्यामुळे आपले हे जीवन सार्थकी होण्यासाठी आपण काय केले पाहिजे व कोणत्या गोष्टी पासून दूर राहिले पाहिजे याचे उत्तम आणि सखोल ज्ञान आणि मार्गदर्शन कुरआन शरीफ मध्ये उपलब्ध आहे.त्यासाठी त्याचे वारंवार वाचन, पठण करून चिंतन आणि मनन करणे आवश्यक आहे.आपण जितके जास्त त्याचे वाचन करू तितका चांगला अर्थ आपल्याला समजणार आहे व त्या पद्धतीने वर्तन करण्यास आपल्याला सुलभ जाणार आहे. एकमेकाबद्दल वाईट बोलू नका,कोणाचे वाईट चिंतू नका, एखाद्या व्यक्तीच्या काही गोष्टी आपल्याला पटल्या नसतील तर प्रत्यक्ष त्याच्याशी बोला व आपले समज गैरसमज दूर करून घ्या, त्यांच्या चुका त्यांच्या निदर्शनाला आणा आणि जास्तीत जास्त चांगले जीवन जगा असं कुरआन शरीफ मध्ये अल्लाहने म्हटले आहे.कुणालाही दोष देऊ नका.विनाकारण कुणाची हेतुपुरस्सर बदनामी करू नका, त्यामुळे मनं कलुषित




होतात. बदनामी हा सर्वात मोठा वाईट गुण आहे त्यापासून अलिप्त राहणे कधीही चांगले. स्वार्थी भावनेने कोणतेही कार्य करू नका समर्पित भावनेने कार्यरत रहा आपल्या प्रत्येक कृत्याचा हिशोब आपल्याला द्यावयाचा आहे हे प्रत्येकाने ध्यानात ठेवावे व त्या प्रमाणे आपले आचरण असावे असेही कुरआनमध्ये म्हटले आहे. कुणाला पाठीमागे वाईट बोलू नका याला गिबत म्हणतात हा फार मोठा गुन्हा आहे यापासून दूर राहा अशी ही शिकवण कुरआनमध्ये दिली आहे. व्याजाशी संबंधित देणे-घेणे दोन्हीही हराम आहे.त्यामुळे व्याजाने पैसे देणे बंद करा. नफा कमावताना प्रमाणामध्ये असावा.जास्त नफेखोरी योग्य नाही.बदला घेण्याची भावना मनाशी कधीही बाळगू नका. तुम्हाला बदला घेण्याचा अधिकार नाही.प्रत्यक्ष एक आणि मनात एक असं वागू नका.जे पोटात आहे तेच ओठात ठेवा.यातच तुम्हा सर्वांच भलं आहे हे लक्षात ठेवा.दिलेले शब्द पाळा.एखाद्याला जर आपण शब्द दिला असेल तर त्याचे पालन करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. त्याप्रमाणे आपण वागावे अशी शिकवण कुरआन शरीफ मध्ये दिली आहे. समाज जीवनामध्ये वावरताना ज्या काही गोष्टी करणे आवश्यक आहे त्या सर्व चांगल्या गोष्टींची शिकवण इस्लाम धर्माने दिली आहे जगातील कोणताही धर्म वाईट नाही जर असेल तर आपण आहोत हे ओळखून प्रत्येकाने आपले जीवन जगावे. (क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

# आज मी विठ्ठल पाहिला"या काव्यसंग्रहाचा प्रकाशनहॉटेल रुद्राय येथे सोहळा संपन्न

## आनंदाचे क्षण घ्यायचे असतील तर साहित्याचा आधार घ्या - कवी प्रकाश होळकर

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड येथील वैनतेय विद्यालयाचे पर्यवेक्षक व कवी गुलाब टकले सर यांच्या आज मी विठ्ठल पाहिला या काव्यसंग्रहाचे प्रकाशन गीतकार, कवी प्रकाश होळकर आणि कवी ,साहित्यिक विवेक उगलमुगले यांच्या हस्ते निफाड येथील हॉटेल रुद्राय येथे करण्यात आले याप्रसंगी बोलताना होळकर यांनी वरील प्रतिपादन केले निफाड आपल्या जीवनात दुःखाचे क्षण विसरून आनंद घ्यायचा असेल तर साहित्य, कविता ,शब्द या गोष्टी आत्मसात कराव्या लागतील असे प्रतिपादन कवी प्रकाश होळकर यांनी केले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त रतन पाटील वडघुले , तर प्रमुख अतिथी म्हणून निफाडचे पोलीस उपअधीक्षक डॉ निलेश पालवे, निफाडचे माजी नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार, निफाडचे उपनगराध्यक्ष अनिल कुंदे, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष शिवाजी ढेपले , दीपक विधाते आदी मान्यवर होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मंदाकिनी टकले




आज मी विठ्ठल पाहिला या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना कवी प्रकाश होळकर, कवी विवेक उगलमूगले, निफाडचे उपनगराध्यक्ष अनिल कुंदे, रतन पाटील वडघुले , शिवाजी ढेपले , दीपक विधाते , सोबत कवी गुलाब टकले ,मंदाकिनी टकले, आदी

यांनी केले याप्रसंगी कवी प्रकाश होळकर, निलेश पालवे, राजाभाऊ शेलार, रतन पाटील वडघुले, अनिल कुंदे, शिवाजी ढेपले, कवी विवेक उगलमूगले,कवी गुलाब टकले, यांची भाषणे झाली याप्रसंगी विश्वास कराड ,मधुकर राऊत ,मधुकर शेलार, दत्ता उगावकर, नगरसेवक साहेबराव बर्डे, नगरसेवक सागर कुंदे, संजय कुंदे, देवदत्त कापसे, विक्रम रंधवे , दिलीप कापसे , संजय गाजरे , भारती कापसे, डॉ सीमा डेर्ले , अरुणा कराड, बाळासाहेब कापसे, प्राचार्य बी.आर.सोनवणे, माजी प्राचार्य एम व्ही जाधव, उपप्राचार्या मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक बी .बी .गुंजाळ, मनोज भागवत, बाळासाहेब कापसे, पांडुरंग कर्डीले, नितीन भागवत, पांडुरंग टकले , हेमंत टकले, बाळासाहेब कापसे, विजय सानप, आदींसह नागरिक उपस्थित होते सूत्रसंचालन रशीद पठाण यांनी केले

## निवडक

### विद्यापीठामध्ये शहिदांना अभिवादन

**नांदेड :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्वागत कक्षामध्ये रविवारी शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर, नारायण हरळीकर, पराग लोणकर, सुनील करमरकर, तनुजा शाह, आदित्य हर्डीकर, जयश्री बोकील, सायली धोंगडे, म. इ. तंगावार, सुरश्री जोशी, दाक्षायणी पंडित, संपदा पाटगावकर, विकास साटम, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, अधिसभा सदस्य शिवाजी चांदणे, रामदास खोकले, बबन हिंगे यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### सणांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा रूट मार्च

**उल्हासनगर :** नागपूरमध्ये नुकत्याच घडलेल्या हिंसक प्रकाराच्या पार्श्वभूमीवर उल्हासनगर शहरात सतर्कतेचा इशारा देत, पोलीस प्रशासनाने रस्त्यावर उतरून नागरिकांच्या मनात सुरक्षिततेचा विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विविध सणांच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती पोलिसांनी शहरातील संवेदनशील भागांमध्ये प्रभावी रूट मार्च काढून कायदा-सुव्यवस्थेचा निर्धार पुन्हा अधोरेखित केला.

# रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबविण्यावर पालिकेचा भर

## शहरातील गृहसंस्थांना मालमत्ता करात ५ टक्के सूट

**भाईंदर :** मीरा-भाईंदर महापालिकेस पुरवठा होणाऱ्या पाण्याच्या मागणीपेक्षा खूपच अपुरा पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे शहरात सर्व ठिकाणी समान पाणीपुरवठा वितरीत करण्यासाठी महापालिकेला तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याबाबत अन्य उपाययोजना राबविण्यासाठी महापालिका प्रयत्न करत आहे. त्यामध्ये शहरातील सर्व गृहसंस्थांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबवून तो कार्यान्वित ठेवणे शक्य आहे, हे प्रकल्प राबवणाऱ्या गृहसंस्थांना मालमत्ता करात ५ टक्के सूट देण्याचा निर्णय महापालिकेमार्फत घेण्यात आला आहे.

मीरा-भाईंदर शहरातील सर्व गृहसंस्थांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प तयार करून त्याची अंमलबजावणी केल्यास आपल्या परिसरातील कुपनलिकेच्या पाण्याचा उपसा वाढण्यास मदत होईल तसेच पावसाळ्यामध्ये इतर खर्चासाठी पावसाचे पाणी साठवून त्याचा वापर केल्याने महापालिकेवर होत असलेल्या पाणीपुरवठ्याचा ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे मीरा-भाईंदर शहरातील सर्व गृहसंस्थांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प उभारण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.

> शहरातील सर्वानी आपआपल्या गृहसंस्थांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबवून त्याची अंमलबजावणी करून या योजनेचा लाभ घेऊन महापालिकेस शहरातील पाणीपुरवठ्याचा ताण काही प्रमाणात कमी करण्यास सहकार्य करावे.
> - **दीपक खांबित**, शहर अभियंता महापालिका



गृहसंस्थांना रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबवण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी महापालिकेने ज्या गृहसंस्था रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबवून तो कार्यान्वीत ठेवतील, अशा गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमता करात ५ टक्के सूट देण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच विविध इमारतींमध्ये विकासकांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबविले असून सद्यस्थितीत त्या इमारती गृहसंस्थाना हस्तांतरीत केले आहेत. या गृहसंस्थानी प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती करून हे प्रकल्प सुरू ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना त्यामधून मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होईल.

# जिल्ह्यात आठ दिवसांचाच रक्तसाठा शिल्लक

- सहा सरकारी रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा
- रक्तदान करण्याचे आवाहन

**ठाणे :** जिल्ह्यात सहा सरकारी रतपेढ्यांमधील आठ दिवसांचाच रक्तसाठा शिल्लक राहिला आहे. अचानक रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने आरोग्य विभागात चिंतेचे वातावरण आहे. रक्ताचा हा तुटवडा भरून काढण्यासाठी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

ठाणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून रुग्णांना लागणाऱ्या रक्ताचा तुटवडा भासू लागल्याने येत्या काही दिवसात मुबलक रक्तसाठा न झाल्यास रुग्णांच्या नातेवाईकांना रक्तासाठी धावाधाव करावी लागणार असल्याची शक्यता आरोग्य विभागाने वर्तवली आहे.

जिल्हा रुग्णालय, उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालय, छत्रपती शिवाजी महाराज कळवा रुग्णालय, कल्याण-डोंबिवली महापालिका, नवी मुंबई पालिका आणि मीरा-भाईंदर महापालिका या सहा ठिकाणी सरकारी रक्तपेढ्या आहेत. रुग्णांच्या शस्त्रक्रिया, अपघात, महिलांना प्रसूतीवेळी रक्ताचा पुरवठा रुग्णालयांना करावा लागतो. मात्र सहा सरकारी रक्तपेढ्यांमधील साठा कमी झाला आहे. यामुळे आरोग्य यंत्रणेवर ताण येणार असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

जिल्ह्यातील महापालिका तसेच ग्रामीण भागातील लोकसंख्या पाहता जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेवर कायम ताण असल्याचे जाणवते. सरकारी रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालय या ठिकाणी रुग्णांची कायमच गर्दी असते.

मुबलक रक्तसाठा करून ठेवणे आरोग्य यंत्रणांचे महत्त्वाचे काम असते. महागड्या शस्त्रक्रिया, प्रसूती तसेच मोठे अपघात यावर खासगी रुग्णालयांमध्ये उपचार करणे गरजू रुग्णांना आर्थिक दृष्ट्या शक्य होत नाही. अनेक रुग्णांची धाव ही सरकारी रुग्णालयांकडे असते. यासाठी सरकारी रक्तपेढ्यांमध्ये मुबलक प्रमाणात रक्तसाठा करून ठेवण्यात येत असतो.

### येथे संपर्क साधावा

इच्छुक रक्तदात्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी, महाविद्यालयीन तरुण-तरुणींनी रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा आणि गरजू रुग्णांना मदत करावी व रक्तदान करून या सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे. तसेच रक्तदान शिबीर आयोजित करावयाचे असल्यास नागरिकांनी जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी गिरीश चौधरी (९८६९६८५२८२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन ठाणे जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

### परीक्षेचा कालावधी असल्याने शिबिरांचे प्रमाण कमी



जिल्ह्यात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयीन विद्यार्थी, सामाजिक संस्था देखील अनेकदा रक्तदान शिबिरांचे आयोजन करत असतात. मात्र सध्या परीक्षांचा कालावधी असल्याने शिबिरांचे प्रमाण अत्यंत कमी झाले आहे, तर यावेळी उन्हाचा तडाखा अधिक असल्याने अनेक सामाजिक संस्था देखील शिबिरांचे आयोजन करत नसल्याने हवा तस रक्तसाठा झाला नसल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

# रायगडमध्ये जलजीवनच्या कामांची खैरात

## सीईओंवर कारवाई करण्याची माजी आमदार पंडित पाटील यांची मागणी



**अलिबाग :** क्षमता नसतानाही एक-एक ठेकेदाराला जलजीवन योजनेतील २५-५० कामे दिली आहेत. या योजना पूर्ण करण्यासाठी शासनाकडेही निधी नाही. त्यामुळे जलजीवनच्या कामांची खैरात वाटणारे रायगड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अलिबागचे माजी माजी आमदार पंडित पाटील यांनी शासनाकडे केली आहे.

माध्यमांशी संवाद साधताना पंडित पाटील यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशनला २०२४ ची डेडलाईन होती. पण योजना पूर्ण न झाल्याने त्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील यांनी एकेक ठेकेदाराला २५-५० कामे दिली. त्यांनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबविला. पूर्वी ठेकेदारांना पन्नास टक्के रक्कम आगाऊ दिली जात होती. त्यामुळे ठेकेदार दहा कामे करायला लागले. पण आज या जलजीवन मिशन योजनेची भीषण परिस्थिती झाली आहे. यातील अपूर्ण योजना पूर्ण करण्यासाठी निधी नाही.

ठेकेदारांना वेळेत निधी मिळत नाही म्हणून आपण काही महिन्यांपूर्वी आवाज उठविण्यात आला होता, विधानसभेतही हा विषय मांडण्यात आला होता. ज्या योजना पूर्ण झाल्या आहेत, त्यांना निधी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. रायगडला तीन-तीन खासदार आहेत. त्यामुळे केंद्र सरकारचा निधी तात्काळ उपलब्ध करून घ्यावा. राज्य सरकारने नवनव्या योजना जाहीर करण्यापेक्षा सुरू असलेल्या योजना पूर्ण कराव्यात, अशी मागणी पंडित पाटील यांनी केली आहे.

### रायगडवासी पिण्याच्या पाण्यापासून वंचित

एकेका ठेकेदाराला ५०-५० कामे देणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर कारवाई करावी. ही कामे सुमारे १५ टक्के कमी दराने दिली आहेत. तर ठेकेदार ५० ते ६० टक्के पैसे घेऊन मोकळे झाले आहेत. जलजीवनच्या अपूर्ण योजनांमुळे रायगड जिल्ह्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे.

### धरणांचा प्रश्न जटील

अलिबाग तालुक्यातील नवखार, मिळकतखार, डावली रांजणखार, मांडवा ही गावे पाण्यापासून वंचित आहेत. मात्र तेथे काही विकासकांची कामे जोरात सुरू असल्यामुळे त्यांना पाणी कसे उपलब्ध होणार. विकासकांना पाणी उपलब्ध झाले तर गावकऱ्यांना पाण्यासाठी गावे सोडावी लागतील. या संदर्भात आपण जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेण्यात आली असून जिल्ह्यातील गाळाने भरलेल्या धरणांचा प्रश्न जटील असल्याचे पंडित पाटील यांनी सांगितले.

# एलएलपी कंपनीच्या फरार संचालिकेस अखेर अटक



**कोल्हापूर :** अनेक गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या ए. एस. ट्रेडर्स अँड डेव्हलपर्स एलएलपी या कंपनीच्या फरार संचालिकेस अखेर पोलिसांनी अटक केली आहे. तब्बल २ वर्षे ३ महिने २६ दिवस फरार असलेल्या सुधा सुधाकर खडके (६२) यांना तळेगाव दुर्गावडी, राज्य गोवा येथून ताब्यात घेण्यात आले. कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या (LCB) पथकाने ही कारवाई केली. ए. एस. ट्रेडर्स व त्याच्या उपकंपन्यांचे संचालक यांनी अनेक नागरिकांना विविध आमिषे दाखवून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. मात्र, गुंतवणूकदारांना आश्वासनानुसार लाभ न देता कंपनीचे कार्यालय बंद करून आर्थिक फसवणूक केल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू आहे.

सदर फसवणूक प्रकरणात आतापर्यंत एकूण १७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान ए. एस. ट्रेडर्स आणि उपकंपन्यांचे संचालक यांच्या नावे असलेल्या १३ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. संचालिका सुधा सुधाकर खडके या गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होत्या. तपास अधिकारी पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी शोधमोहीम राबवली. पोलीस अंमलदार राजू येडगे, विजय काळे, प्रविणा पाटील व राजेंद्र वरंडेकर यांच्या पथकाने मिळालेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे गोवा येथून आरोपीला अटक केली. अटक करण्यात आलेल्या सुधा खडके यांना न्यायालयाने २७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली असून पुढील तपास सुरू आहे.

# शेती विभागाच्या ऑफिसला आग

**कराड :** सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मरळी येथील बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याच्या शेती विभागाच्या कार्यालयाला शनिवारी रात्री भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत शेतीचे ऑफिस संपूर्णपणे जळून खाक झाले आहेत. मात्र आगीचे नेमके कारण अद्यापही स्पष्ट झालेले नाही.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे कामकाज राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या नेतृत्त्वाखाली चालत असून त्यांचेच सुपुत्र यशराज देसाई हे कारखान्याचे चेअरमन म्हणून काम पाहत आहेत. या सहकारी साखर कारखान्यास शनिवारी रात्री भीषण आग लागल्यानंतर ही आग जवळपास अडीच ते तीन तास सुरू होती.

यावेळी तातडीने आग विझवण्यासाठी मरळी सहकारी साखर कारखाना, कराड येथील कृष्णा हॉस्पिटल व कराड नगरपालिकेसह धावरवाडी, ता कराड येथील जयवंत शुगर या साखर कारखान्याचे अशा वेगवेगळ्या अग्निशामक दलांना पाचारण करण्यात आले होते.

# होळीनंतर बोटी बंदरातच, म्हावरं कडाडल्याने खवय्यांच्या जिभेला मुरड

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा, आक्षी, अलिबाग, रेवस वगैरे मासेमारी करणारे खलाशी सुट्टीवर असल्याने आणि होळीचा हंगाम सुरू असल्यामुळे मासळीच्या दराने ही उसळी घेतली आहे.मासेमारी करणाऱ्या कोळी समाजाचा होळी हा अतिशय मोठा सण असल्याने या निमित्ताने गेल्या पंधरा दिवसांपासून हजारो मासेमारी बोटी नांगर टाकून किनाऱ्यावर विसावल्या आहेत. परिणामी मासळीची आवक घटली आहे. त्यामुळे ताज्या मासळीच्या दरात प्रचंड वाढ झाली आहे. याचा फटका खवय्यांना बसू लागला आहे. यात पापलेट, सुरमई, हलवा आणि कोळंबी यासह अनेक चविष्ट माशांचे प्रकार कमी प्रमाणात मिळत असल्याने किलोमागे या माशांचे दर अधिक वाढले आहेत.मासेमारी करणारे खलाशी सुट्टीवर असल्याने आणि होळीचा हंगाम सुरू असल्यामुळे मासळीच्या दराने ही उसळी घेतली आहे. शिवाय बदलत्या वातावरणामुळेही मासळीची आवक घटल्याने मासळीच्या दरात २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. सागरी किनाऱ्यावरील हजारो बोटी बंदरात नांगरून ठेवण्यात आल्या आहेत. पावसाळ्यातील दोन महिन्यांचा कालावधी वगळता वर्षातील दहा महिने खलाशी व तांडेल खोल समुद्रात मासेमारीच्या निमित्ताने कुटुंबापासून दूर असतात. परंतु हे मच्छीमार कुटुंबाबरोबर होळीचा सण साजरा करण्यासाठी माघारी परततात. काही दिवस तरी मासेमारी बंद राहणार असल्याने होळी सणाच्या आधीपासूनच मासळीची आवक घटली आहे. परिणामी भाव चांगलेच कडाडले आहेत.

मासळीचे दर वाढल्याने ग्राहक हैराण झाले आहेत, पण यामागे अनेक कारणे आहेत. डिझेल, बर्फ, जाळी, आणि देखभाल यांचे खर्च प्रचंड वाढले आहेत. शिवाय, हवामान बदलामुळेही मासळी कमी मिळते. या सगळ्याचा परिणाम मासळीच्या दरांवर होत

**विनायक पाटील,प्रथमेश बनिया,दर्शन सुडकू**
**मच्छीमार**

# महावितरणच्या पथकाला मारहाण करणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**मुरबाड :** थकीत वीजबिलाची वसुली करण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या पथकाला मारहाण व शिवीगाळ करणाऱ्याविरुद्ध मुरबाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार मुरबाड तालुक्यातील सरळगांव येथे शुक्रवारी घडला.

प्रफुल्ल दशरथ गोडांबे अशी या प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. मुरबाड उपविभागात कार्यरत उच्चस्तर लिपिक मंगेश केवारी व जनमित्र नरेश इसामे शुक्रवारी दुपारी सरळगाव येथे वीजबिल वसुलीचे काम करत होते. आरोपी गोडांबेच्या कटलरी दुकानाचे सहा महिन्याचे दहा हजार रुपयांचे वीजबिल थकीत आहे. हे वीजबिल भरण्याची विनंती केली असता आरोपीने शिवीगाळ व दमदाटी करत जनमित्र इसामे यांना मारहाण केली.

उच्चस्तर लिपिक केवारी यांच्या फिर्यादीवरून मुरबाड पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्ह्याची नोंद करून तपास सुरू केला आहे. मार्च अखेरच्या पार्श्वभूमीवर वीजबिल थकबाकीची वसुली अन्यथा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करणे हे दोनच पर्याय वीज कर्मचाऱ्यांसमोर आहेत.

# ...समाजाला भूल देणे सत्ताधीशांना सोपे जाते - चिपलकट्टी

**वसई :** अनुवांशिकतेनुसार मानवी जनुके कितीही श्रेष्ठ असली, तरी मेंदू त्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणानुसार विकसित होत जातो. भीती आणि चिंतेच्या वातावरणातून आलेल्या नकारात्मक भावना बौद्धिक पातळीचा ऱ्हास करीत जातात. त्यातून मेंदूवरील तणाव वाढून तो आज्ञाधारक होत जातो. त्यात विरोध करण्याचे आणि प्रश्न विचारण्याचे धारिष्ट उरत नाही. मग असे लोक किंवा समाजाला भूल देणे राजकीय आणि धर्मीय सत्ताधीशांना सोपे जाते, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखिका, तथा विचारवंत अंजली चिपलकट्टी यांनी बंगली, वसई (प.) येथे बोलताना रविवारी केले.

लोकसेवा मंडळ आयोजित आणि बॅसीन कॅथॉलिक सहकारी बँक पुरस्कृत उपवासकालीन व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प "माणूस असा का वागतो?" या विषयावरील अंजली चिपलकट्टी यांच्या व्याख्यानाने आज रविवारी बंगली येथील सभागृहात गुंफण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बॅसीन कॅथॉलिक सहकारी बँकेचे अध्यक्ष बॅनॉल्ड डायस हे होते.



### नळ पाणीपुरवठा योजना अर्धवट राहिल्याने नाराजी

# पिंपळास गावातील नागरिकांचे पाण्यासाठी हाल

**सुमित घरत/भिवंडी**

भिवंडी तालुक्यातील पिंपळास ग्रामपंचायतसाठी जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेले नळ पाणीपुरवठा योजना दीड वर्षे झाली तरी अर्धवट स्थितीत असल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. याप्रकरणी ठेकेदाराने दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. तालुक्याच्या ग्रामीण नागरिकांसाठी शासनाने जाहीर केलेल्या योजना ठेकेदार आणि संबंधित ग्रामीण पुरवठा विभागातील काही अधिकारी या योजनेच्या भ्रष्ट कारभारात अडकून पडल्याचा आरोप ग्रामीण भागातील शेतकरी आणि नागरिकांकडून केला जात आहे. भिवंडी तालुक्यातील काही ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नळ' ही योजना रखडल्याने ऐन उन्हाळ्यात सर्वसामान्य नागरिकांचे हाल आहेत. याबाबत नागरिकांच्या तक्रारी जिल्हापरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडे दाखल होत आहे. यापूर्वी ही योजना आदिवासी भागात न राबविल्याने श्रमजीवी संघटनेनेही आंदोलन छेडले होते. तसेच तालुक्यातील वाहूली गावात ही योजना अर्धवट स्थितीत असल्याने गावातील ग्रामस्थांच्या ठेकेदाराविरोधात तक्रारी दाखल झाल्या आहेत.

आता मौजे पिंपळास ग्रामपंचायत क्षेत्रात ही योजना मरणावस्थेत असल्याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे ठेकेदारावर कारवाई होणे अपेक्षित असताना त्याच्यावर कोणतीच कारवाई झालेली नाही. तरी संबंधित ठेकेदारास दिलेला ठेका रद्द करण्यासाठी शासकीय स्तरावर योग्य ते प्रयत्न व्हावेत, अशी मागणी केली असून याबाबत जिल्हापरिषदेच्या पाणीपुरवठा विभागास लेखी निवेदन देण्यात आले. यावेळी पिंपळास गावातील पांडुरंग नागांवकर, शरद नागांवकर, सोमवार म्हात्रे, देवनाथ ठाणगे, गणेश म्हात्रे, भरत घरत, द्वारकानाथ पाटील, जयदास पाटील, मनोज म्हात्रे, मनोज चौधरी, नागेश म्हात्रे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### पाणी योजनेपासून दीड वर्षे वंचित

मौजे पिंपळास येथे नळ पाणीपुरवठा योजना मंजूर झाली असून या योजनेचा भूमिपूजन सोहळा २४ नोव्हेंबर २०२३ रोजी केंद्रीय मंत्री कपील पाटील यांच्या हस्ते करण्यात आला होता. त्यानंतर ठेकेदाराने पाण्याच्या टाकीचे अर्धवट काम करून व काही ठिकाणी खोदाई करून पाइपलाइन टाकले. त्यानंतर ठेकेदाराने या कामाकडे दुर्लक्ष केले आहे. १ कोटी ८५ लाख ४० हजार १७३ रुपये अंदाजपत्रक असणाऱ्या कामाचा ठेकेदाराने बोजवारा उडवला आहे. गावात झालेले कामही निकृष्ट दर्जाचे व अर्धवट राहिल्याने पिंपळास गाव पाणी योजनेपासून सुमारे दीड वर्षापासून वंचित आहे. यामुळे स्थानिकांमध्ये नाराजी पसरली आहे.



### कामाची चौकशी करून कारवाई करावी

दरम्यान, पिंपळास गावासाठी जिल्हापरिषदेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत जलजीवन मिशन योजनेंतर्गत 'हर घर नळ' या कामाचा ठेका मे.विहान कन्स्ट्रक्शनचे मालक दिनेश कापसे यांना देण्यात आला होता. त्यांनी वेळेत काम न करता ग्रामस्थांची गैरसोय केल्याप्रकरणी त्याच्या कामाची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी तरुण भारत विधायक सामाजिक संघटनेचे अध्यक्ष जगदीश पताळे यांनी केली आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे व गटविकास अधिकारी पंचायत समिती भिवंडी यांना निवेदन दिले आहे.